म. ग्रं. सं. ठाणें

विषय चरित्र

संग्रहालय क्रमांक ५१ / ४०४

लेखक चिंतामण गंगाधर भानू

सन १८९१

पुस्तकाचें नांव डिमास्थेनीस यांचे चरित्र

५१

चरित्र

[illegible]. ग्रं. सं. ठाणें
चरित्र
[illegible]

# डिमास्थेनीस यांचें चरित्र.

इंग्लिश ग्रंथाधारें

चिंतामण गंगाधर भानू, बी. ए.,

प्रोफेसर फर्ग्युसन कालेज, पुणें,

यांनी लिहिलें,

तें

पुणें "आर्यभूषण" छापखान्याचे म्यानेजर

यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

प्रसिद्धकर्त्यांनें सर्व प्रकारचे हक्क राखिले आहेत.

सन १८९१

[illegible]

पुणें येथें
"आर्यभूषण छापखान्यांत छापिलें."

# डिमास्थेनीस याचें चरित्र.

## प्रस्तावना.

डिमास्थेनीस असें नांव उच्चारल्याबरोबर सिसरोची आठवण झाल्यावांचून राहतच नाहीं; कारण या दोन्ही नरपुंगवांच्या आयुश्चरित्रांत व संसारसमुद्रांत चमत्कारिक सादृश्य आहे. एक तर प्राचीन वक्तृत्वामध्यें दोघेही बृहस्पतीच होते. शिवाय दोघांनींही आपला खांदा पडल्या पक्षास दिला; दोघांचेंही स्वशहरांतून निष्कासन झालें; व प्रवासांतून परत आल्यावर दोघांचाही जानपदांनीं अत्यंत सन्मान केला; आणि शेवटीं स्वदेश ठार बुडतो अशी निराशेनें खात्री झाल्याव‹ जास्त दिवस जगण्यापेक्षां दोघांसही मृत्यु येईल तर बरें असें झालें. हा सादृश प्रकार झाला.

असो; अत्युत्कृष्ट आणि अत्युदार वक्तृत्व असणें हा गुण लाभण्यास हृदयास टोंचणारी मनाची खातरी झाली पाहिजे. जुन्या लोकशासनपद्धतीची सिसरो यास अत्यंत आवड होती ह्या व्यवस्थेचा जन्माभ्यास त्यास झाला असल्यामुळें एकाच व्यक्तीच्या हातांत राजकीय शक्तीचा संचय होणें ह्मणजे देशास अधःस्थिति प्राप्त होणें आहे, अशी त्याची समजूत असे. आमचा ग्रीक मुत्सद्दी यासही, आपल्या देशांतील स्वतंत्र व स्वशासनदक्ष अशा समाजबाहुल्याचा लय होऊन त्या सर्वांचें मिळून एका परकीय राज्याचें अगर बादशहीचें एक परावलंबी संस्थान व्हावें. यापरती आपल्या देशावर अधिक हानिकारक गदा येणें नाहीं असें वाटत असे. हा देशभक्तीचा मनोधर्म उत्कृष्ट आहे हें सर्वांस कबूल असलें पाहिजे. तथापि ग्रीस देशांत ह्या वेळीं ह्या मनोधर्माची सार्थकता होण्याचें दिवसानुदिवस कठिणतर होत चाललें होतें, हें विसरतां कामा नये. डिमास्थेनीस प्राचीन स्वदेशसंस्थांचा निःसीम भक्त होता, आणि परकीय राजांच्या धमकावणीस भिणें अगर त्यांस आपल्या कामांत ढवळाढवळ करूं देणें ह्या दोन गोष्टी जीव जाईपर्यंत करावयाच्या नाहींत अशा आपल्या पूर्वजांच्या दृढ

निश्चयावर बोलण्याची जेव्हां जेव्हां संधी येई, तेव्हांचें त्याचें वक्तृत्व सौंदर्यशिखरास जाऊन पोंचत असे यांत काय नवल आहे? सारांश असें म्हणण्यास हरकत नाहीं कीं उत्कृष्ट वक्तृत्वशक्ति ही मनोमय भक्तीची सहचारिणी आहे.

सर्वत्र तुलना केली असतां रोमन बृहस्पतीपेक्षां ग्रीशियन वाचस्पती श्रेष्ठतर व्यक्ति होती अशी खातरी होईल. दुसऱ्याचें निदान धैर्य व एककार्यपरता हीं जास्तीच होतीं. त्याचें मुत्सद्दीपणाचें चरित्र महद्योग्यतेचें असून त्यांत विसंगतता कोठेंही नव्हती. षड्रिपूंच्या आधीन तो फार थोडा वेळ झाला. आतां हें खरें आहे कीं सिसरोच्या अंगीं विशेष सौजन्य असून तो अनेक गुणसंपन्न होता. पण त्याच्या वृथाभिमानानें व अहंमन्यतेनें शेवटीं शेवटीं फार घाण झाली. डिमास्थेनीसमध्यें हे दोष नसून त्याच्या मनांत सर्वदां ग्रीसदेशाची कमान वरती कशी चढेल अशाविषयींचे विचार घोळत असत. वक्ता ह्मणून पहा अगर मुत्सद्दी ह्मणून पहा, डिमास्थेनीस हा वरच्याच प्रतींत जाणार.

डिमास्थेनीस ख्रिस्ती शकाच्या पूर्वी चवथ्या शतकांत हयात होता, तेव्हां त्या शतकाची थोडक्यांत माहिती देणें हें इष्ट आहे; कारण डिमास्थेनीसचीं भाषणें ह्या माहितीशिवाय कळणें अशक्य आहे. हें सुवर वृत्त फार घोटाळ्याचें असल्यामुळें तें सर्व थोडक्यांत स्पष्टपणानें सांगतां येणें अमळ कठिणच आहे, तथापि ही माहिती कळणें अवश्य, सबब साधारणतः ठळक गोष्टी हें चरित्र समजण्यापुरत्या कायत्या दिल्या आहेत.

ख्रि० श० पूर्वी ५ व्या शतकांत अथेन्स हें सर्व ग्रीक जगांत श्रेष्ठ होतें. अनेक देशांवर अथेन्सचा या शतकांत अंमल होता. ह्या लोकांचें वर्चस्व जरी त्रासदायक नव्हतें तरी दुय्यम संस्थानांस ह्या त्यांच्या शिरजोरपणाबद्दल मत्सर उत्पन्न झाला होता. सिसिलीवरील स्वारी पाहून तर अथीनियन लोकांच्या मनांत चोहींकडे स्वराज्य स्थापून बादशाही प्रळय करणें आहे अशी शंका सर्वांच्या मनांत जागृत झाली. जलयुद्धामध्यें स्वकौशल्यानें अथेन्स सर्वशक्तिमान् होतें तरी थीब्स, स्पार्टा वगैरे जमिनीवरील युद्धांत कुशल असे शत्रू फार प्रबल होते. सिसिली येथें अथेन्सचा पचंबा उडाल्यावर स्पार्टापुढें त्याचा टिकाव लागेना. सरतेशेवटीं इगास्पोटामी येथें अथेन्सचा पूर्ण पराजय होऊन त्याचें सर्व आरमार स्पार्टाच्या ताब्यांत आलें, आणि त्या शहराचें वर्चस्व नाहींसें होऊन त्यास स्पार्टाचें अंकित व्हावें लागलें.

स्पार्टाचें वर्चस्व ख्रि० श० पूर्वी ३७१ वर्षापर्यंत राहिलें. त्यांची राज्यपद्धत चांगली व लोकप्रिय होण्यासारखी नव्हती. प्रत्येक शहरांत

अल्प लोकांचा एक प्रबल पक्ष तयार करून व त्या लोकांस लष्करी मदत देऊन त्या शहरावर आपला शह कायम ठेवावा हें त्यांच्या शासन-पद्धतीचें मूलतत्व होतें. स्पार्टाचे हिताची गोष्ट असली म्हणजे ती रास्त आहे हा त्यांचा न्याय होता. तेव्हां अर्थातच ही आत्मलाभी पद्धति सर्वत्र दुःसह होत चालली. परशियाशीं तह करून स्पार्टानें सर्व एशिआस्थ ग्रीशियन लोकांस परशिआच्या ताब्यांत दिलें! अथेन्स शहरास 'जुलमी' असें म्हणत, पण स्पार्टा व अथेन्स यांच्या जुलुमांत जमीनअस्मानचें अंतर! अथेन्सनें ग्रीक मता विरुद्ध कोणतेंही काम केलें नाहीं. जीव जाईपर्यंत त्यानें ग्रीक लोकांस परशियाच्या ताब्यांत दिलें नसतें. ग्रीक राष्ट्रांत कोठेंही संभुवन होण्यासारखें असल्यास स्पार्टानें तो बेत लागलाच हाणून पाडावा आणि त्यास आपल्या झोंटिंगपाच्छाई खालीं शक्तिहीन ठेवावें असा त्याचा क्रम सुरू होता. या योगानें परिणाम मात्र असा झाला कीं परकीय राजाकडून ह्या सर्व देशाचा पराभव होण्याची व पारतंत्र्य येण्याची वेळ जवळ आली. वास्तविक पाहिलें असतां संभुवन ( अनेक नगरें कांहीं कारणाकरितां एकच करणें ) करून त्यांत एक शहर मुख्य असावें व कोणी एखादा परकीय शत्रू आला असतां सर्व मुख्य शहरांनीं एकत्र होऊन आपल्या मित्रगणांसह त्या शत्रूचा पाडाव करावा अशी इच्छा व आशा व त्यांचें साफल्य यांतच ग्रीसचा मोठेपणा व बळकटी आहे, असें या वेळेपर्यंत मानलें जात असे. यास पॅन हेलीनिझम अगर ग्रीशियन स्वदेशाभिमान असें म्हणत. या अभिमानाचा आधारस्तंभ स्पार्टानें खणून टाकिल्यामुळें ग्रीक इमारतीचा पाया ढासळून गेला. सारांश ग्रीस देशावर पारतंत्र्याची जी गदा आली ती येण्यास बऱ्याच अंशीं स्पार्टाचें वर्चस्व कारण झालें. ख्रि० श० पूर्वी ३८३ सालीं टोरोनच्या आखा-ताजवळ चाल्सिडिसद्वीकल्पांत आलिंथसनामक शहराच्या साह्यानें एक संभुवन तयार होत होतें. त्यावर हल्ला करून ह्याचा नाश करण्याचें श्रय स्पार्टानेंच घेतलें!! आलिंथियन संभुवन राहिलें असतें तर म्या-सिडोनियाचें राज्य वाढणें व शेवटीं सर्व ग्रीक लोकांच्या स्वातंत्र्याचा अस्त होणें ह्या गोष्टी मृगजलवत् झाल्या असत्या. पण असें व्हावयाचें नव्हतें.

या व्यतिपाती स्पार्टाचें वैभव ३७१ सालीं ल्युक्ट्राच्या मैदानावर जी लढाई झाली तीमध्यें धुळीस मिळून गेलें. इपॉमिनांडास नामक वीरानें स्पार्टाचा पराजय करून आपलें शहर जें थीब्स त्याला प्राथमिक पदवीस नेलें. पिलापोनीसस् द्वीपकल्पांत जें स्पार्टाचें वर्चस्व होतें तें तेथें एका संस्था-नाचा जीर्णोद्धार करून व दुसरे ठिकाणीं ४० ग्रामांचें संभूवन करून, नाहींसें करून टाकिलें. स्पार्टाचा प्रांत आंखडला. ही जी धोंड त्या राष्ट्रावर

येऊन पडली त्यापासून झालेला नाश दुरुस्त करण्याचा प्रसंग स्पार्टास कधींच आला नाहीं.

लोकसत्ताकराज्य, विद्याव्यासंग, श्रीमंती इत्यादि कारणांमुळें व अथीनियन लोकांमध्यें जी वेतसवृत्ति होती तिच्यामुळें प्राप्त झालेल्या संकटास विसरून जाऊन आपल्या नैसर्गिक उत्साहानें ते लोक पुनः महत्वाच्छा धारण करीत व त्या अनुरोधानें कामें उद्युक्त असत. आपलें गतवैभव पुनः मिळवावें या संकल्पानें प्रज्वलित होऊन त्यांनीं राज्य मिळविण्याकरितां कंबर बांधिली आणि एक महासंभुवन तयार करून त्याचा पुढाकार आपण घेतला. व्यापार वाढला; संपत्ति वाढत चालली; आणि थीब्सपासून प्रथमपद हिसकून घेऊन ग्रीस देशांत आपण मुख्यत्वानें राहूं लागले. पण ह्यावेळीं अथेन्सच्या सर्व लढाया पगारी सैनिकांकडून होत असत. अथेन्स या लोकांस पगार न देतां बाहेर जाऊन स्वारीचा खर्च भागवावा असें सांगत असे. सेनापतीस अर्थातच जिकडे पैसा मिळण्याचा लाग असे, तिकडे आपल्या सैनिकांसहवर्तमान जावें लागे. गरीब लोकांवर जुलूम होई, व दोस्त शहरांस अत्यंत उपसर्ग होत असे; यामुळें अथेन्सच्या आश्रित वर्गाचें मन त्याच्या विरुद्ध होऊं लागलें. शिवाय अथेन्सनें राज्य वाढविलें तें संभुवनाच्या जोरावर, आणि सिंहाचा वांटा घेतला आपण !! या कारणांनीं अथेन्सची शक्ति विस्कळित झाली होती ती त्यांच्या दोस्तांनीं ३५८ नांत जी लढाई केली त्यांत बरीच नष्ट झाली. याउपर लढाईच्या भानगडींत पडूं नये असा आयसोक्रेटीस वगैरे लोकांनीं केलेला उपदेश लोकांस स्वस्वभावामुळें आवडूं लागला. सर्व लोकांस स्वस्थता, चैन व सुखोपभोग ह्या गोष्टी आवडत असत. त्यावेळेस कामाकरितां निवडले जाणारे मुत्सद्दी याच पंथाचे होते. फोकिअन, यूब्यूलस वगैरे मंडळी त्यांतलीच. सारांश स्वतः लढाई करावयाची नाहीं, पगारी सैनिक लढाईस पाठविले असतां त्यांच्या पगाराची व्यवस्था बघावयाची नाहीं, देशांतील शिल्लक राहिलेला पैसा लोकरंजनार्थ धार्मिक उत्सव करण्यामध्यें नाहींसा करून टाकावयाचा, व्यक्तिमात्रानें पैसा मिळविण्याकरितां लागेल तें कर्म करण्यास मागें पुढें पाहावयाचें नाहीं, अशा तऱ्हेची सध्यांच्या कालीं लोकमताची दिशा होती. अथेन्सचा व्यापार मोठा होता, व आरमारही मोठें होतें. पण अथीनियन लोकांच्या सुखशीलत्वामुळें त्यांस लढाईकरितां बाहेर जाणें आवडेना; ह्यामुळें त्यांचीं जीं चार्ही मुलखांत ठाणीं असत त्यांचें संरक्षण होईनासें झालें, व ह्याच संधीस मासिडोनिआच्या गादीवर बसलेला फिलिप हा रणशूर असल्यामुळें अथेन्सनगरींचा एक एक प्रांत त्यांच्या हातून सुटून जाऊं लागला, व फिलिपचें प्रस्थ वाढूं लागलें.

हा राजा ३५९ त गादीवर बसला त्यावेळीं मासिडोनिआचे हाल कुत्रा खात नव्हता. पण राज्यावर आल्याबरोबर यानें आपल्या सैन्यामध्यें अनेक सुधारणा करून तें एक जीवंत यंत्रच करून ठेविलें; आपल्या सर्व शत्रूंचा पराजय केला व नंतर ग्रीस देशांत श्रेष्ठ होऊन बसलेलें जें अथेन्सचें राज्य, त्यांतील एक एक प्रांत हळू हळू घेऊं लागला. जिंकलेल्या ठाण्यांत एक पर्वतावरील ठाणें होतें तेथें फिलिप यास सुवर्णाची खाण सांपडली, त्यामुळें स्वतः त्याचे दारिद्र्यविच्छिन्न होऊन लोकांस लांच देण्याइतका तो श्रीमंत झाला. एकदां थीब्स शहरांत त्यास ३ वर्षे राहणें भाग पडल्यामुळें फिलिप यास ग्रीक लोकांच्या आवडीनिवडी सर्व कळून गेल्या होत्या. हें साधन हातांत सांपडलें ह्मणून शहरांचा पाडाव करण्यास त्यास कधींही अडचण प्राप्त झाली नाहीं. कारण पैशाच्या मदतानें व मनोहर भाषणानें तो दुसऱ्याचें मन हलोहाल काबीज करी. डिमास्थेनीसचा सर्व प्रयत्न अथीनियन लोकांस फिलिपविरुद्ध युद्ध करण्यास तयार करावें हा होता; पण दुसऱ्याच्या धूर्तपणानें आमच्या बृहस्पतीचें कांहींएक चाललें नाहीं. हें द्वंद्व युद्ध डिमास्थेनीसच्या आयुश्चरित्रावरून स्पष्ट होईल.

डिमास्थेनिसचा जन्मकाळ निश्चित करणें कठिण आहे. तो सुमारें इ० स० पूर्वी ३८५ वर्षांत जन्मास आला असावा. ह्यावेळीं स्पार्टाचें वर्चस्व सर्व ग्रीक राष्ट्रांवर असून त्यांचा शब्द ह्मणजे कायदा अशी सर्वत्र स्थिति होती. पुढें इ० स० पूर्वी ३७१ त ल्युक्ट्राच्या लढाईमध्यें थीब्स या नगराचा विजय होऊन पिलापिडास व इपामिनांडास हे दोघे महात्मे प्रसिद्धीस आले. त्यांनीं आपल्या राष्ट्राची सरशी केली. परंतु ३६२ सालीं मांटिनिआच्या लढाईत जय मिळविला तरी इपामिनांडाससारखा मोहरा हरवल्यामुळें थीब्स नगराचा अकरावा गुरू संपून बारावा शनि येण्याची वेळ आली होती. याच शहरांत ग्रीक राष्ट्रांच्या नगरीस्वतंत्रतेस चुरगळून टाकणाऱ्या फिलिपचें विद्याध्ययन झालें होतें हें मागें यथाप्रसंगीं सांगण्यांत आलेंच आहे. या राजकीय धांदलींत डिमास्थेनीस लहानाचा थोर झाला. लिहून ठेवण्यासारखें जरी त्याच्या नगराच्या (अथेन्स) हातून कांहीं झालें नव्हतें, तरी सर्व ग्रीक राष्ट्रांत त्याची प्रसिद्धि असून अथीनियन लोकांचा व्यापार सपाट्यानें वाढत होता. डिमास्थेनिसचा बाप श्रीमंत होता व त्याची चोहींकडे उत्कृष्ट मान्यता होती. त्याचा शिकलगारीचा व पेट्या करण्याचा धंदा असे. एका कारखान्यांत ३२ गुलाम व दुसरीकडे २० गुलाम खपत असत. जहाजवाल्या व्यापाऱ्यांस तो कर्जाऊ पैसे देत असे. घरही चांगल्या किमतीचें असून त्यांत सामानही भरपूर असे. त्याची बायको श्रीमंत बापाची मुलगी होती. तिचे स्वतःचेंच असे पुष्कळ दागदागिने होते; परंतु तिचें माहेरचें कुल चांगलेंसें नव्हतें. कारण

तिची आई रानटी जातीची असावी असा लोकप्रवाद त्याच्या प्रतिस्पर्ध्यांच्या भाषणांत आपल्यास दिसून येतो.

डिमास्थेनीस यावर लहानपणीं पितृविरहाची अवघड धोंड येऊन पडली. सुमारें ३५०० पौंडांची मालमिळकत बापानें मागें ठेविली. इतकी जिनगी असणारा माणूस अथेन्स शहरांत श्रीमंतांच्या पहिल्या वर्गांत मोडत असे. भरंवशाच्याठिकाणीं सुद्धां व्याजाचा दर शेंकडा बारा असल्यामुळें व इतर धोंवयाचे ठिकाणीं जास्त व्याज मिळत असल्यामुळें वरील जिनगीवर सुमारें ६०० पौंड व्याज दरवर्षी येण्यास हरकत नव्हती. अथेन्स येथें सुखानें व मानमान्यतेनें राहण्यास २०० पौंड पुष्कळ होत असत. सारांश, डिमास्थेनीस हा बराच श्रीमंत व्हावा अशी बापानें तजवीज करून ठेविली होती. आपली संपत्ति सुरक्षित रहावी, व पुढें मुलाच्या ताब्यांत सबंद जावी ह्मणून त्यानें आपल्या खात्रीचे असे पालनकार नेमले. पण तिघेही पालनकार लबाड, बिनअब्रूचे, गद्दीचोर असे निघून डिमास्थेनीस वयांत आल्यावर त्याच्या हातांत त्यांनीं ३०० पौंड शिलक म्हणून ठेविले! हिशेब दाखवितांना खोट्या रकमा ढकलून देऊं लागले, तेव्हां डिमास्थेनीसनें फिर्याद केली. त्यांत यास जय येऊन पालन करणारांकडून ३००० पौंड द्यावे असा निकाल झाला; पण त्यांतील किती ऐवज आमच्या डिमास्थेनीसच्या ताब्यांत आला हें सांगणें कठीण आहे. तात्पर्य तो जगांत शिरला तो दारिद्र्यरूपी भांडवल घेऊन. दुर्दैवाच्या या घाल्यानें डिमास्थेनीसच्या स्वभावावर चांगला परिणाम झाला. दृढनिश्चय व कार्यनिष्ठा हीं गरिबीमुळेंच त्यास प्राप्त झालीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

लहानपणापासून तो अशक्त असल्यामुळें ग्रीक विद्येचें मुख्य अंग जें शारीरशिक्षण त्याचा त्यास गंधही नव्हता. त्याची बुद्धि चपळ असे ह्मणून त्यास मानसिक शिक्षणाचीच फार आवड असे. श्रीमंती व हौस हीं दोन्ही साधनें अनुकूल होतीं ह्मणून लहानपणीं उत्तम उत्तम शाळेंत जाऊन त्यानें जुन्या ग्रंथांचा परिचय करून घेतला. बोलणें व पाठ म्हणणें या विषयां वरील त्याची भक्ति अनावर होती. कोठेंही भाषण होत असलें कीं तो हटकून तेथें जावयाचाच. कालिस्ट्रेटसनामक वक्त्याचें भाषण ऐकून त्याच्या मनावर विलक्षण परिणाम झाला, व स्वतः आपण बोलावें अशी त्यास इच्छा उत्पन्न झाली. पण लहानपणापासूनच तो तोतरा असल्यामुळें ही आपली मनीषा तृप्त होत नाहीं असें त्यास वाटलें. पण या अडचणीमुळें त्यानें आपल्याइच्छेचा त्याग केला नाहीं. इसस या नांवाचा पहिल्या प्रतीचा एक वकील असे; त्याकडे जाऊन तो शिक्षण घेऊं लागला. आयसोक्रेटीसच्या शाळेंत हा जाऊं लागला. महा विचारी प्लेटो हा आपल्या तत्वविचेच्या पूर्ण वैभवांत या काळीं होता, तेव्हां डिमास्थेनीस यास त्याच्या उपदेशाचा लाभ झाला असेल असें मानण्यास एक कारण

आहे, तें हें कीं डिमास्थेनीसनें आपल्या भाषणांत त्याचे उन्नत नीतिविचार आणण्याचे प्रयत्न केले; व तत्ववादांत जो विषय होता त्याची प्रत्यक्ष राजकीय कामांस योजना केली. थ्युसिडायडीसच्या इतिहासाचें आठ वेळ पारायण करून तो त्यानें तितक्याच वेळां लिहून काढला होता. ही भाषणाची तयारी झाली. पण अशक्त व तोतरी वाणी यांपुढें काय करावयाचें ? पण असल्या अडचणी गुंडाळून ठेवणारा डिमास्थेनीस ! तो तोतरेपणा घालविण्याकरितां तोंडांत खडे घालून बोलण्याचा अभ्यास करी; फुप्फुसें विशाळ होऊन आवाजही बळकट व्हावा म्हणुन आपल्या भाषणाची संथा टेंकड्यांवर चढतांना घेई; आवाज पहाडी व्हावा म्हणून मोठालीं वादळें सुटलीं असतां तो लाटांच्या भयंकर आरोळ्यांत आपलें भाषण करी; वक्तृत्वकलेचा अभ्यास करितांना व्यत्यय न यावा म्हणून अर्ध्या डोक्याची हजामत करी आणि गुहेंत अभ्यास करीत बसे. अर्थात तसल्या वेषानें जाणें म्हणजे लोकांकडून हंसून घेण्यासारखें होतें. इतक्या सोशिकपणानें व अमर्यादस्त अभ्यासानें त्यानें आपली तयारी केली तरी जय येण्याचें चिन्ह दिसेना ! ! अर्थानियन लोक पहिल्या प्रतीचे चिकित्सखोर व मिजासखोर होते त्यामुळें याच्या बोलण्याचें कांहीं तेज पडेना. * पिरीयसवरून एकदां तो अगदीं खिन्नवदन करून भडकत चालला असतां एका वृद्ध गृहस्थानें हांक मारून त्यास सांगितलें कीं 'तुमची भाषणशैली थेट †पेरिक्लीजसारखी आहे, पण सभेंत तुमच्या स्वतःच्या घाबरण्यानें तुमचा घोंटाळा होतो, तेव्हां घाबरणें टाकून द्या.' असा त्यानें उपदेश केला. एकदां असाच तो जयविन्मुख होऊन निराशेनें उदासीन होत्साता वाटेनें चालला असतां साटिरिस नांवाचा नाट्यकलाप्रवीण व लोकप्रिय नट त्यास भेटला. त्यापाशीं अंतःकरण उघडें करून डिमास्थेनीस ह्मणाला 'या वक्तृत्वकलेच्या पायीं मीं इतकी मेहनत घेतली व शरीरप्रकृती खराब करून टाकिली तरी मला जयप्राप्ति होत नाहीं आणि दारू पिऊन झिंगलेले अक्षरशून्य खलाशी लोक माझ्यावर पगडा करितात ! तेव्हां माझें नशीबच खडतर आहे असें ह्मटलें पाहिजे.' 'तुह्मांस एक उपाय सांगतों.' साटिरिस ह्मणाला. तुह्मी माझ्या देखत ‡युरिपायडीस अगर *सोफोक्लीस यांच्या नाटकांतील भाषणें पुस्तकांतून वाचा.' डिमास्थेनीसनें तसें केल्यानंतर साटिरसनें पुनः तेंच भाषण ह्मटलें. तें अगदीं निराळें आहे असें डिमास्थेनीस यास वाटलें. सारांश अंगविक्षेपाचा व स्वरविभक्ततेचा धडा साटिरिसपासून डिमास्थेनीसनें घेतल्याबरोबर न्यायसभेंत त्याचा विजय

* अथेन्स शहराचें बडें बंदर.

† पांचव्या शतकांतील अति उत्तम मुत्सद्दी.

‡ अथेन्स येथील दोन महा कवी.

होत चालला व त्याकडे पुष्कळ कामें येऊं लागलीं. कायदा आणि राजनीति यांमध्यें त्यावेळीं अथेन्स शहरांत विशेषसा फरक नव्हता यामुळें न्यायसभेंत याची चहा होऊं लागल्याबरोबर राजकार्यांत याचा प्रवेश होऊन त्याचें भाषण ऐकण्याविषयीं सर्व लोक उत्सुक होऊं लागले. याप्रमाणें डिमास्थेनीस यानें आपल्या धीरसहिष्णुता, अंगमेहनत आणि महत्वेच्छा या गुणांच्या योगानें वक्तृत्वामध्यें जी राजपदवी मिळविली आहे, ती कोणासही आजपर्यंत हिसकावून घेतां आली नाहीं.

## भाग १.

### राजकर्मांत अंतःप्रवेश.

लोकसत्ताक राज्यांत श्रीमंत लोकांवर पुष्कळ भिस्त असते. अथेन्समध्येंही अशाच तऱ्हेची राज्यपद्धति असून श्रीमंत लोकांनीं अमुक अमुक एक सार्वजनिक कामें केलीं पाहिजेत असा कायदा होता. अथीनियन लोकांस आनंदांत आयुष्य नेणें आवडे व त्याकरितां मनोरंजन नित्य असावें याबद्दल श्रीमंत लोकांवर जबाबदारी असे. एका दिशेनें विचार केला असतां ही पद्धत बरी दिसते. श्रीमंत लोकांस यापासून शिक्षण मिळतें तें असें कीं ' आपण जी संपत्ति मिळवितों, ती केवळ स्वोपभोगाकरितां नाहीं, आपल्या देशबांधवांस सुखी करणें व त्यांची मनोन्नति करणें हीं कृत्यें आपण केलीं नाहींत तर आपल्या हातांत असलेला कीर्तिभाग आपण आपल्या हातानें नाहींसा करतों असें होतें. ' आनंद आणि उत्सव यांच्या उपभोगांत सुद्धां राजकीय जबाबदारीकडे आपलें उत्कृष्ट लक्ष आहे अशी पेरिक्लिसानें अथीनियन लोकांविषयीं बढाई मारली होती. चवथ्या शतकापर्यंत या पद्धतीनें नागरिक कारभार चालला. गवई आणि नर्तक यांचे ताफे स्वखर्चानें तयार करून धर्ममहोत्सवांत त्यांचें कौशल्य सर्व जानपदांस दाखविणें, मल्लांच्या आणि कसरतवाल्यांच्या जोड्या आपल्या पैशानें शिकवून कुस्त्या, गुद्दागुद्दी, धांवण्याच्या, घोड्यावर बसण्याच्या, मशाली घेऊन पळण्याच्या, शर्यतींचे प्रयोग लोकांस दाखविणें, पुण्यक्षेत्रांत वार्षिक उत्सव सुरू झाला म्हणजे स्वनगरीच्या तर्फेनें धर्ममंडळी मोठ्या डामडौलानें आपण स्वतः तिकडे पाठविणें, जातिभोजन देणें, व सर्वांत महत्वाचें काम तें हें कीं अथेन्स नगरीचे संरक्षणार्थ ठेविलेलें आरमार कार्यक्षम स्थितींत ठेवणें,–इत्यादि मोठमोठ्या खर्चाचीं कामें श्रीमंत लोकांकडून घेतलीं जात. हीं कोणासही चुकवितां येत नसत. फक्त कायद्यानें मात्र कांहीं लोकांस त्यांच्या उत्कृष्ट कामाबद्दल बक्षीस म्हणून

शेवटच्या शिवाय बाकीच्यां जोखमींतून सजा मिळत असे. हल्लींच्या काळांत कांहीं दिवस काम केल्यावर जसा पगार [illegible] आहे त्याप्रमाणें नागरिक कृत्यांपैकीं अमुक कृत्यें तुह्मीं अगर कधीं तुमच्या मुलांनीं करूं नयेत अशी तुह्मी नगराची उत्कृष्ट सेवा केली तर त्या काळांत परवानगी मिळत असे.

अशा पद्धतींत कालांतरानें दोष शिरणें, अगर ज्यांस हक्क मिळाले असतील त्यांच्या संबंधानें लोकांच्या मनांत मत्सरभाव उत्पन्न होणें हें साहजिक आहे. असें झाल्यावर गांवगुंड लोकांस चांगलेंच फावतें. असो; ३५६ सालीं लेप्टाईन यानें लोकसभेपुढें असा मसुदा आणिला कीं पाठी-मागें दिलेल्या सर्व सजा रद्द कराव्या आणि त्या सालापासून पुढें सजा मागितल्यास अगर दिल्यास तें बेकायदेशीर असावें. पुष्कळ लोकांस हा कायदा चांगला वाटला; कारण सजा नाहींशी झाली ह्मणजे पुष्कळ लोकांवर लोकरंजनाची पाळी येईल व निष्कारण पक्षपात होत होता तो नाहींसा होईल असें त्यांस वाटलें, आणि ह्मणून त्यांनीं ती सूचना मंजूर केली. दुसरे वर्षी प्रतिपक्ष जोरावर होऊन त्याचें वाकपतीत्व आमच्या विषयनायकानें घेतलें. या वेळीं त्याचें वय ३० वर्षांचें होतें. त्याचें भाषण शांत, मुद्देशीर, युक्तिबद्ध आणि शब्दानुलक्षी असें आहे. गेल्या *लढाईनें पुष्कळ पैसे खर्च झाले असल्यामुळें, मांडलिक संस्थानांकडून करभार येण्याचें तहकूब झाल्यामुळें, व व्यापार बसल्यामुळें नगरास थोडी अवकळा आली होती व लोकमनोरंजनसाधनें नाहींशीं झालीं होतीं तीं पुनः उत्पादन करण्याचा व कांहीं लोकांस फुकट सजा मिळाली होती ती काढून घेण्याचा या कायद्याचा उद्देश होता. या कायद्याविरुद्ध भाषण करणें मोठ्या जोखमीचें काम होतें. कारण या कायद्यास अनुकूल असा पुष्कळ लोकांचा अभिप्राय होता. डिमास्थेनीस याचे भाषणांतील मुख्य मुद्दा 'संपत्तीपेक्षां सत्कीर्ति हजारपट चांगली आहे' असा होता. पहिल्यानें त्यानें सांगितलें कीं "कांहीं लोकांनीं आपल्या हक्काचा दुरुपयोग केला ह्मणून सर्वांचा तो हक्क काढून घेणें हें अन्याय्य आहे. देशभक्तीस प्रोत्साहन देणाऱ्या गोष्टीचें यानें निर्दलन होत आहे, चांगली इमानानें चाकरी केली असतां बक्षीस मिळावयाचें नाहीं असा कायदा तुह्मीं करीत आहांत. आपल्या पूर्वजांनीं दिलेल्या वचनांचा भंग करण्याचा पसारा तुह्मीं मांडला आहे, त्यानें येवढें मात्र होईल कीं इतःपर तुमच्यावर स्वकीय अगर परकीय लोकांचा भरवसा बसणार नाहीं. मनोदारतेमध्यें

---

* ३५८–३५५ पर्यंत एक मोठें युद्ध मांडलिक संस्थानें व अथेन्स यांमध्यें चाललें होतें. अथीनियन लोकांचा पराजय हें त्या युद्धाचें पर्यवसान झालें.!!

सगळ्या ग्रीसचें नाक जें अथेन्स त्या नगरानें आपली न्यायबुद्धि, औदार्य आणि परहितविषयीं कळकळ ह्यांचा त्याग करूं नये. ही गोष्ट अत्यंत महत्वाची आहे. भविष्यकालामध्यें काय गर्भित आहे हें आपल्यास माहीत नाहीं, आणि ह्मणूनच आपल्या कार्यक्षमतेची शक्ति वचनांच्या भंगानें आतां जखडून टाकावी हें कृत्य क्षुद्रमनाचें निदर्शक आहे. हा जगन्नियंत्याच्या घरीं आपण अपराध करीत आहों आणि आपल्या औद्धत्याबद्दल आपल्यास त्याकडून शिक्षा मिळण्याचा खचित संभव आहे. आपल्या पूर्वजांनीं संपत्ति मिळविली. पण ती कशाकरितां? 'यावचंद्रदिवाकरौ' आपली कीर्ति ठेवतील अशीं कृत्यें करण्याकरितां. नांव मिळविण्याकरितां खासगी थैली रिकामी करण्यास त्यांनीं कधींही मागें घेतलें नाहीं. आपण मात्र या कायद्यानें आपल्यावर मत्सरी, कृतघ्न आणि इमानशून्य अशीं विशेषणें लावून घेत आहोंत. दुष्ट लोकांनीं नगरनाशाकरितां केलेलें सुद्धां कर्ज देण्याचें आपण नाकारलें नाहीं, इतकी आपली वचनप्रीयता आहे. वचनभंग हा या नगराचा धर्म नाहीं म्हणून हा कायदा कायम ठेवणें प्रशस्त नाहीं. कांहीं लोकांस सत्कृत्यें केल्याबद्दल विशेष हक्क मिळतात त्यांचा हेवा करूं नका. सद्गुणप्रीतिबद्दल आपला डंका वाजतो आहे तो फोडूं नका आणि पुढील कालांत कोणत्या अडचणी येतील, कसल्या मनुष्यांची गरज लागेल, कोणते प्रसंग येतील, हें आपल्यास माहीत नाहीं; याकरितां विशेष प्रसंगीं योग्य बक्षीस देण्याचा जो आपल्यास हक्क आहे तो आपल्या हातांतून काढून घेऊन पुढें पश्चात्तापास कारण होईल असें वर्तन करूं नका."

हें भाषण शांत आणि गंभीर आहे. डिमास्थेनीसच्या भाषणावरून त्याच्या निष्कपट मनाची खातरी होते. ह्या भाषणानें डिमास्थेनीसचा हेतु साध्य झाला ह्मणजे वरील कायदा रद्द झाला आणि तो पहिल्या प्रतीचा वाक्सिंह आहे अशी त्याची मोठी कीर्ति झाली.

याच सालीं अथेन्सवर परशियन महाराजाची स्वारी होणार अशी अफवा उठली होती. परशियाचें राज्य बऱ्याच भरभराटींत होतें. पैशाची चंगळ होती. फौजफांटा बराच होता. त्याचा राज्यविस्तार अवाढव्य असून त्याच्या हाताखालीं मोठमोठाले सुभेदार होते. सारांश, ग्रीक राष्ट्रसमूहाला परशिआचें राज्य हीं लक्षांत ठेवण्याजोगी बाब असून त्यांच्याशीं परशियाचा वारंवार प्रसंग घडत असे. तो राजा आपला शत्रु असा साधारण समज होता तरी ग्रीक राष्ट्रसमूहांत जिवाभावाची एकी कधींच न झाल्यामुळें या साधारण शत्रुत्व मनोधर्मास ग्लानता आल्यामुळें कित्येक नगरें स्वलाभाकरितां परशियाशीं स्नेह करण्यास तयार होतीं. ३५६ मध्यें अथीनियन सेनानायकांपैकीं चेरीसनामक सेनापतीस बंडखोर मांडलिक

संस्थानांचें आरिपत्य करण्यास पाठविलें असतां पैशाचे अडचणींस्तव त्यानें आपली चतुरंग सेना घेऊन महाराजाविरुद्ध अर्थाबेझसनामक सुभेदारानें बंड केलें होतें त्यास मदत केली. त्यानें राजकीय फौजेचा फडशा पाडला तेव्हां ... होऊन त्यानें अथेन्सनगरपित्याकडे चेरीसच्या विनाकारण अग्रेसरत्वाबद्दल तक्रार केली. पुढें लवकरच बातमी उठली कीं ३०० जहाजांत अफाट सैन्य बसवून परशियन महाराज अथेन्स नगरीवर स्वारी करणार; तेव्हां अथीनियन जानपदांची धांदल झाली. मांडलिक संस्थानांशीं त्यांनीं तह केला. परशिआशीं युद्ध करण्याची तयारी करावी, ग्रीक राष्ट्रसमूहांत एकी करून परशिआवर हल्ला करावा आणि आपण जुन्या शत्रूचा खरपुस समाचार घ्यावा असें प्रसिद्ध वक्ता अलंकारगुरु आयसोक्रेटीस व युबूलसचा* पक्ष यांचें ह्मणणें पडलें. ह्या दुराग्रहाचें खंडन करावें एतदर्थ डिमास्थेनीसनें भाषण ३५४ त केलें. "आपण लढाई उकरून काढली असतां आपल्यास खरी मदत करणारीं राष्ट्रें कोणतीं आहेत हें युद्धप्रिय लोक सांगतील काय? आपसांत धुमसणाऱ्या मत्सराग्नीनें प्रज्वलित नगरें, आपणच लढाई सुरू केली असतां, आपल्या विरुद्ध परशियास मदत करतील, आणि या उघड वैरभावाबद्दल आपलें सर्वत्र हंसें होईल. याकरितां लढाई आपण सुरू करण्याची तयारी न करितां आपल्यावर हल्ला झाल्यास आपल्या स्वसंरक्षणाची तयारी करा, आपलें आरमार सुधारा, पगारी सैन्य ठेवण्याच्या ऐवजीं स्वतः लढाईस तयार असण्याचें शिका, वाडवडिलांच्या महत्कृत्यांची काहणी सांगत न बसतां त्यांच्याप्रमाणें करणी करण्यास तयार व्हा, आणि विश्वास आणि लाभालाभैकत्व या दोन तत्वांवर ग्रीक राष्ट्रें एक करा. परशियन महाराज जरी आपला हाडवैरी आहे तरी त्याच्या राज्यांत आपण जाऊन युद्ध करणें मला प्रशस्त दिसत नाहीं; कारण ग्रीक राष्ट्रांत परस्पर स्नेह नाहीं. कांहीं लोक त्यास मदत देतील; ह्मणून आपली युद्धसामुग्री जय्यत करा आणि लढाई करणें तीं सत्य व न्याय्य अशाकरितां करा. परशियन महाराज आपल्यावरच चढाई करून आल्यास आपल्यास मदत करणारे कांहीं महात्मे निघतील. परशिआस लढाई करणें झालीच तर ते इकडे न येतां ग्रीक राष्ट्रांस पैसे पेरून आपल्या विरुद्ध काहूर आणतील. असा अनर्थ आपल्या हातानें आपल्या अंगावर आणूं नका. इतर राष्ट्रांस राष्ट्रीय हिताची काळजी नाहीं. ते केवळ स्वकार्यसाधू आहेत. तुमचें तें तसें नाहीं. कोणत्याही ग्रीक संस्थानास परशियाच्या ताब्यांत जावें लागलें असें तुमच्या करणीनें झालें नाहीं. तेव्हां पुढेंही असलें गचाळ

---

* अथेन्स शहरांत प्रमुखत्वानें वागणारा एक श्रीमंत गृहस्थ.

कृत्य करूं नका. भयंकर लढाई होऊन तुमचा नाश व्हावा अशी पुष्क-ळाची इच्छा आहे? शिवाय लढाईस लागणारा पैसा कोठें आहे? पर-शियाचें सैन्य अथेन्सच्या हद्दींत शिरल्याशिवाय आमच्या श्रीमंत लो-कांकडून एक छदाम मिळेल तर शपथ ! ! प्रत्यक्ष प्रसंग ओढवला तरच आमचीं धनिक मंडळी पैसे देतील, पण आधीं एक दमडीसुद्धां देणार नाहींत. सारांश लढाई आली म्हणून घाबरूं नका. जितका पराशिया आम्हां-स वाईट आहे तितकाच इतरांस आहे. तथापि आपल्या संकटकाळीं साह्य करण्यासारखा आपला मित्रवर्ग नाहीं. अनहित करणारे शत्रू पुष्कळ आहेत. तर ग्रीक राष्ट्राची अशी दैन्यावस्था लोकांस दाख-विण्याचें पातक घेऊं नका. परशिआ आपल्यावर आलाच तर त्याक-रितां मात्र अवश्य तयारी जय्यत असूं द्या." ह्या भाषणांत डेमास्थेनी-सच्या मुत्सद्दीपणाची गुरुकिल्ली आहे. आपण कोणाच्या वाटेस जाऊं नये; पण कोणी अंगावर चालून आलाच तर मागें सरूं नये,-हें या भाषणाचें तात्पर्य आहे. ग्रीक राष्ट्र एक करण्याचे प्रयत्न वंध्यापुत्रलाभाप्रमाणें असंभवनीय आहेत असें त्यास समजलें होतें. या भाषणामध्यें त्याचें वस्तुज्ञान व व्यवहारचातुर्य दिसून येतें.

पुढील सालीं त्यानें भाषण केलें त्यांत ग्रीक राष्ट्रांतील अनेक नगरस्थ लोकांविषयीं त्याचें काय मत होतें तें त्यानें सांगितलें आहे. ग्रीक देशांत * शक्तिसमता पाहिजे व कोणत्याही नगरानें विशेष शक्तिमान् असूं नये असें त्याचें मत होतें. ल्युक्ट्राची लढाई झाल्यानंतर मेगालापालिस नामक स्वतंत्र राष्ट्राची स्थापना होऊन मेसिना संस्थानास आपलें पूर्वस्वातं-त्र्य मिळालें व तेणेंकरून स्पार्टा अगदीं शक्तिहीन झाला हें मागें सांगि-तलेंच आहे. स्पार्टास हा अपमान गिळून टाकणें फार कठीण होतें, तेव्हां त्या नगराचे बेत मेगालापालिस व मेसीना यांचा उच्छेद करावा असे चालले होते. हें साहजिकच आहे पण असें त्यांस उघड बोलतां येईना, तेव्हां त्यांनीं ग्रीक राष्ट्रांपुढें असें आमिष टाकलें कीं सर्व राष्ट्रांनीं पूर्वस्थिति आणण्याची खटपट केल्यास स्पार्टा पुढाकार घेण्यास तयार आहे. थीबन लोकांनीं अथेन्सचा आरोपस नांवाचा एक गांव लाटला होता त्यामुळें त्या लोकांना अर्थीनियन लोकांस फार राग आला होता तेव्हां ही सूचना अर्थीनियन लोकांस अगदींच अमान्य नव्हती. स्पार्टाकडून लोक-सभेपुढें वकील आले तेव्हां सपाटून झपाट्याचा वादप्रतिवाद झाला. स्पा-र्टानें मागें केलेलें नुकसान विसरून जाऊन लोक म्हणूं लागले कीं आ-रोपस परत मिळण्याकरितां स्पार्टा म्हणतो ती सूचना ग्रहण करावी. डिमास्थेनीसचें मत याविरुद्ध होतें. तो ह्मणाला "स्पार्टानें सध्यां कपट-

---

* कोणीही आपल्याहून श्रेष्ठ असूं नये अशी इच्छा. ( Balance of power ).

प्रयोग चालविले आहेत. आपण त्यास मागें जी मदत केली त्याबद्दल ते आपले उतराई न होतां आपल्यास एका अन्यायाचे कामीं मदत करा ह्मणून सध्यां ओरड करीत आहे. थीब्सनें आमचें आरोपस शहर घेतलें आहे तें परत मिळण्याकरितां आपण आर्केडियन* संभुवनाचा उच्छेद करावा हें मला प्रशस्त दिसत नाहीं. आरोपस आम्हास न मिळालें तरी बेहेत्तर आहे, पण स्पार्टाचे अन्यायाचे पद्धतीस, व त्यानें जें आमिष टाकलें आहे त्यास आपण भुलून जातां उपयोगी नाहीं. स्पार्टन लोकांच्या ताब्यांत मेगालापालिस गेल्याबरोबर मेसीना प्रांतावर त्यांचा शह बसेल. मग तुह्मांस थीब्सशीं स्नेह करावा लागेल. संकटसमयीं थीब्सचा आश्रय करून मग स्पार्टाची महत्वाकांक्षा दाबण्यापेक्षां सध्यांच जर आपण थीब्सशीं मैत्री केली तर हें कृत्य सन्मानयोग्य होणार आहे. स्पार्टानें बलवान होणें हें अथेन्सला पथ्यकर नाहीं. त्याचा पेंच आपली गेलेली सत्ता परत मिळविण्याबद्दल आहे व स्पार्टा बलवंत असणें हें ग्रीक लोकांस व विशेषतः आपल्यास भयावह आहे. याकरितां स्पार्टास मदत न देतां मेगालापालिसास मदत करावी हें न्यायास व मुत्सद्दीपणास योग्य आहे"

अथेन्सनें मेगालापालिसास मदत केली नाहीं. स्पार्टानें त्या संभुवनाशीं दोन वर्षें लढाई चालविली, पण त्यास विशेषसा फायदा झाला नाहीं. थीब्सची मदत आल्याबरोबर स्पार्टाचे हातपाय गळून त्यास शेवटीं तह करावा लागला. पण अथेन्सच्या तटस्थ वृत्तीचा परिणाम असा झाला कीं, पुनः जेव्हां स्पार्टानें मेगालापालिसवर हल्ला केला तेव्हां तत्रस्थ लोकांनीं अथेन्सकडे तोंडें वेंगाडण्यास न जातां एकदम परकीय राजा फिलिप याची मदत मागितली. ( त्यास हें हवेंच होतें ! ) अथेन्सबद्दल लोकांची समजूत झाली कीं पिलापोनिससच्या संस्थानांत स्वातंत्र्याबद्दल लढाई सुरू झाली असतां अथेन्सकडून सत्पक्षास अंतःकरणपूर्वक मदत मिळणें नाहीं ! डिमास्थेनीसचें ह्मणणें स्वीकारलें असतें तर अथेन्सचा बोज राहून ग्रीक स्वातंत्र्याचा शत्रु आणि विध्वंसक फिलिप याचा मार्ग कुंठित करण्याची शक्ति त्यांस प्राप्त झाली असती. फिलिपचें राज्य सध्यां बाल्यावस्थेंत असून त्यास कोणी मोजीत नव्हतें हें खरें आहे, पण डिमास्थेनीसनें ज्या पद्धतीचा उपदेश केला ती पद्धत स्वीकारली असती तर अथेन्स हें ग्रीक लोकांच्या सन्मानास व कृतज्ञेस पात्र होऊन आपल्या पुढील शत्रूंची ढवळाढवळ बंद करण्याची शक्ति त्या नगरास आली असती.

---

* अनेक राष्ट्रें एकत्र होऊन एका कायद्यानें वागण्याचें कबूल करतात तें.

## भाग ३.

ग्रीसच्या इतिहासांत ३५२ हें साल मोठमोठ्या गोष्टींचें जनक झालें. मॉसिडोनियाचा राजा फिलिप याचें बल वाढलें असतां तो ग्रीक स्वातंत्र्यास 'राम' ह्मणावयास लावणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं. थीब्स आणि फोक्रिसमध्यें 'धर्मयुद्ध' सुरू झालें, त्यांत प्रथमतः थेसली येथें फोकियन सेनापति आनोमार्कस याच्या हातून त्याचा पराजय झाला व पुष्कळ नुकसान झालें तरी तो रणांगणांतून पळून न जातां लढवय्या मेंढ्यासारखा विशेष जोरानें पुढें येण्याकरितां थोडा मागें सरकला. पुढें त्यानें लवकरच आपल्या पराजयाचा चांगला सूड उगवून आनोमार्कस व त्याचें सैन्य यांस धारातीर्थी मरणदीक्षा घेण्याचें भाग पाडलें. थेसली हा सर्व प्रदेश त्याच्या ताब्यांत आला व मासिडोनिया हें राज्य मध्यग्रीसांत एक जबरदस्त शक्ति होऊन बसलें. राजा फिलिप याचें अद्भुत युद्धकौशल्य व प्रचंड सेना यांच्यापुढें एकाकी ग्रीक संस्थानांचा टिकाव लागेल कीं नाहीं ही गोष्ट संदेहास्पद झाली आणि तो ग्रीस देशावर स्वारी करील अशी भीति उत्पन्न झाली. *थर्मापिली नामक घाट ताब्यांत घेण्याकरितां तो ससैन्य आला पण अथेन्सनें जलदी करून त्या घाटाचा बंदोबस्त केल्यामुळें फिलिपास विन्मुख होऊन परत जावें लागलें. थेसलीचा कबजा पूर्णपणें घेतल्यावर व अथेन्सच्या जलव्यापारास पुष्कळ त्रास दिल्यावर थ्रेसकडे त्यानें आपला मोर्चा वळविला. तेथील अंतस्थ बेबनावांचा फायदा आपण करून घ्यावा व सर्व प्रांत आपल्या ताब्यांत घ्यावा अशी त्याची इच्छा होती. ती अंशतः पूर्ण करून त्यानें अथेन्सच्या ताब्यांत असणाऱ्या थ्रेशियन कर्सोनीज नामक प्रांताचा धुळधाण करण्याचा तडाखा सुरू केला. तेव्हां अथेन्समध्यें हलकल्लोळ उडाला. हा प्रांत फिलिपच्या ताब्यांत जाणें ह्मणजे अथेन्सनें उपाशीं मरण्यासारखेंच होतें; कारण धान्याचा पुरवठा तिकडून होत होता. ह्या वेळेस तरी त्यांचे डोळे उघडावयास पाहिजे होते; पण फिलिप आजारी आहे, फिलिप मेला अशा बातम्या पोंचल्याबरोबर त्यांची उद्भवलेली भीति नाहींशी होऊन ते नागरिकांच्या खुशालचेंडूपणांत स्वस्थ जाऊन पडले. लोकनायक युब्युलस हा शांततेचा खरा भक्त होता. स्वदेशाभिमानी †फोक्रिअन याची अशी खातरी झाली होती कीं फिलिप-

---

* इकडे त्यास 'धर्मपुरी' असें म्हटलें असतां चालेल.

† या वेळीं अथेन्स शहरांत सत्यधर्माचा अवतार, लढाईमध्यें धीट, सेनापतित्वामध्यें बराच हुशार असा हा गृहस्थ होता; पण स्वभावतःच उदासीन असल्यामुळें तो अथेन्सच्या कल्याणाबद्दल फारशी काळजी करीत नसे.

सारख्या प्रचंड राजाशीं लढाई सुरू करण्यास अवश्य लागणारे श्रम आणि सहनशक्ति आपल्या लोकांत उत्पन्न करणें शक्य नाहीं, तेव्हां या मार्गानें खटपट करण्याचें त्यानें सोडून दिलें होतें. फिलिप बरा होऊन पुनः त्यानें समुद्रावर अग्रेसरत्वाचा प्रकार चपलतेनें सुरू केला असें कळल्यावर अथेन्स नगरींत लोकसभा भरली. 'समुद्राचे आपण धनी आहोंत' असा अथेन्सचा डौलाचा अभिमान असतां एका रानटी राजानें येऊन आपल्यास जलमार्गांत त्रास द्यावा हें त्यांस फारच कडू लागलें. तरीं त्या नगरींत जानपदांच्या चुक्या स्पष्टपणानें सांगण्याचें धारिष्ट करणारा कोणीही मुत्सद्दी नव्हता. 'जहाजावर जाऊन स्वतः मेहनत केली पाहिजे' असें कटुवाक्य अथीनियन लोकांस ऐकावयास नको होतें. असो, या वेळीं डिमास्थेनीसनें लोकांच्या चुक्या सांगून त्यांची कानउघाडी करण्याचा प्रयत्न केला. उत्तरेकडे स्वतंत्र व सुघटित राज्य स्थापण्याचें फिलिपचें बेत त्यास अगोदरच कळून चुकले होते. धैर्य धरून लोकांस कडू लागणारी कां होईना पण ती सूचना करण्याचा निश्चय त्यानें केला व फिलिप नाशक शत्रू आहे असा कर्णा त्यानें वाजविला.

" सध्यांचे प्रसंग अनिष्ट आहेत ह्मणून निराश होण्याचें कारण नाहीं. आपण हातपाय न हलविल्यामुळें भूतकालामध्यें नुकसान झालें आहे. भविष्यकाळीं आपण उद्योग केला तर फायदा होईल. माझ्या ह्मणण्याचा भावार्थ असा आहे कीं आपलें जें मागें नुकसान झालें तें आपण आपलें कर्तव्य केलें नाहीं ह्मणून. कर्तव्य करून जर आतांचा प्रसंग आला असता तर मात्र सुधारण्याची आशा करण्याला जागा नव्हती. थोड्याच दिवसांपूर्वी स्पार्टाची सत्ता केवढी होती ? पण तुह्मींचना मोठ्या धैर्यानें व उदारमनानें अथेन्सच्या शत्रूकडे लक्ष देऊन ग्रीक लोकांस स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला ? हें सांगावयाचें येवढ्याचकरितां कीं वेळीं सावधान राहून प्रयत्न केला असतां कोठेंही भिण्याचें कारण राहत नाहीं, हें आपल्या लक्षांत यावें. स्पार्टाची शक्ति आणि फिलिपची उद्धत महत्वाकांक्षा यांचा आपणच विचार करा. सध्यांची फिलिपची अवाढव्य शक्ति आणि सर्व बळकट जागा नाहींशा झालेले आपण, याचा विचार केला असतां फिलिप हा भयंकर शत्रू आहे असें कोणी ह्मणेल तर तें वावगें नाहीं असें मी ह्मणतों. फिलिपनें ज्या जागा आमच्याकडून हिरावून घेतल्या त्या घेण्याच्यापूर्वी आपलें राज्य केवढें होतें ? सर्व सभोंतालचीं राष्ट्रें आपला स्नेह करण्यास कशीं तत्पर होतीं हें तुमच्या ध्यानांत आहेच. असो, यावेळीं जर फिलिपनें असाच विचार केला असता, व अथेन्स फार विस्तृत व शक्तिमान आहे तेव्हां आपण कांहीं न करितां स्वस्थ बसावें असें त्यानें ह्मटलें असतें तर त्याचें राज्य

इतकें विस्तृत झालें असतें काय ? पण त्यास प्रथमच हें तत्व समजलें आहे कीं "बळकट ह्यांनीं हीं लढाईंतील बक्षिसें आहेत, 'वेळेस हजीर असेल तो वजीर होतो', आणि निःकाळजी लोकांची मालमत्ता श्रम करणाऱ्या साहसी मनुष्यास मिळते." या तत्वास अनुसरून त्याचें वर्तन आहे. तो नेहमीं योग्य असेल तितकी खटपट खुषीनें करितो ह्मणून तो सर्वांस प्यारा झाला आहे. योग्य वेळेवर स्वतः काम करण्यास जर तुम्ही शिकलां, कोणतीही सबब न सांगतां राज्यास जी लागेल ती मदत देण्याचा पत्कर प्रत्येकानें घेतला, श्रीमंतांनीं थैल्या सोडून पैसे दिले, सशक्त माणसांनीं सैनिकाचें काम करण्याची हमी घेतली. सारांश आपल्या शेजाऱ्याची वाट न पाहतां आपलें कर्तव्य प्रत्येकजण वेळेवर करूं लागला तर ईश्वरी प्रसाद तुमच्यावर होऊन तुमचे सर्व प्रांत तुम्हांस मिळतील, शत्रू मित्र होतील आणि फिलिपचा फडशा उडून जाईल. त्याचें राज्य कांहीं दैविक नाहीं. त्याचे राज्यांतील लोकच त्याचा द्वेष करीत आहेत, त्याचा हेवा करीत आहेत. त्याचे मित्र केवळ त्याच्या भरभराटीचे सोबती आहेत. तेव्हां चेंगटपणा आणि आळस सोडून देऊन लढाईस तयार व्हा ह्मणजे भ्यालेली सर्व मंडळी तुमच्या गोटांत परत येतील. तयारीच्या संबंधानें पुढील तजविजी अवश्य केल्याच पाहिजेत. ५० लढाऊ जहाजें बंदरावर जय्यत पाहिजेत. अर्धे घोडेस्वारांचें सामान तेथें पाहिजे. फिलिपचा कोठें हल्ला येतो असें कळलें कीं त्याच्याबरोबर तेथें सामना करण्यास आपली तयारी पाहिजे. आपण आपला हलगर्जीपणा सोडून दिला असें त्यास समजल्यास व कदाचित् त्याचा समूळ नाश करण्यासही उद्युक्त होऊं असें त्यांस भासूं लागल्यास त्याची दांडगाई बंद होईल यांत कांहीं नवल नाहीं.

"ईश्वरदत्त जें सामान तुमच्यापाशीं आहे, त्याचा उपयोग तुह्मीं कधींही केला नाहीं. तुमची गत नवख्या मुष्टिमल्लासारखी आहे तोंडावर बुक्की लागली ह्मणजे तिकडे हात नेतां, तोंच खांद्यावर आली कीं तिकडे चोळायाला लागतां, कानशिलावर थापट बसली कीं चोंची करीत तुमचा हात तिकडे जातो, अशी तुमची गत झाली आहे. जिकडे तो जातो तिकडे तुह्मी अजागळासारखे जातां. आपण होऊन तुह्मी लढाईची एक ही नवीन योजना केली नाहीं, एकदां सुद्धां पुढचें धोरण तुमच्या लक्षांत आलें नाहीं. काय करावयाचें तें तुह्मास फिलिपनें सांगावें लागतें आतां ही स्थिति एक क्षणभर तरी टिकूं देण्याची वेळ राहिली आहे काय ? ईश्वराची खरोखर तुमच्यावर मेहरबानी ह्मणून फिलिपच्या अंगांत चपलादेवीचा येवढा संचार झाला आहे. मिळालें तेवढ्यानंच तो संतुष्ट असता तर तुमच्यापैकीं कित्येक लोकांस सध्यां देशावर आलेल्या भित्रेपणाच्या

आरोपाची व झालेल्या दुष्कीर्तीची छाया उत्तमच असें जें वाटत आहे, त्यांतच आपणा सर्वांस राहवें लागलें असतें. जर तुह्मी निराशेनें उदासीन झालां नसाल तर त्याच्या नेहमीं वाढत जाणाऱ्या बळजबरीनें तुमच्या मनांत कधीं तरी ईर्षा उत्पन्न झालीच पाहिजे. फिलिपच्या युद्धकंडू शमविण्याकरितां लढाईस तुह्मी प्रारंभ केलात आणि त्याचा शेवट आपलाच जीव बचवावा असा झाला हें पाहून एकास सुद्धां वाईट वाटत नाहीं याचें मला आश्चर्य वाटतें.

आपल्यापैकीं कांहीं लोक चवाठ्यावर बसून बाता मारीत असतात कीं स्पार्टाशीं मैत्री करून फिलिप थीब्स शहराचा नाश करणार व सर्व स्वतंत्र संस्थानांचा फडशा पाडणार. दुसरा ह्मणतो, छेः त्यानें परशिअन बादशाहाकडे मदतीचें संधान लावलें आहे. तिसरा गप्प ठोकतो कीं फिलिप इलीरियामधील किल्ल्यांची डागडुजी करीत आहे!! याप्रमाणें आपण गप्पाठोकक्यांचा धंदा पत्करिला आहे. मला वाटावयास लागलें आहे कीं, महत्कृत्यांच्या बाहुल्यानें फिलिप उन्मत्त होऊन त्याच्या मनांत असले कांहीं बेत आले असावेत. पण आपल्या कृत्यांचे बेत आमच्या येथील आळशी व उनाड लोकांस कळविण्यासारखा तो मूर्ख नाहीं अशी माझी खातरी आहे तेव्हां असल्या बाता मारण्याचें सोडून देऊन आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, फिलिप आपल्यास नागवीत आहे; त्यानें फार दिवसांपासून आपली नाचक्की केली आहे; जिकडून आपल्यास मदत मिळेल असें वाटलें तेथें आपल्यास शत्रू उत्पन्न झाले आहेत; आपला भविष्यकालीन सोक्षमोक्ष आपल्या स्वतांच्या कर्तबगारीवर अवलंबून आहे; आणि फिलिपच्या राज्यांत आपण लढाई केली नाहीं तर तो आपल्याशीं लढाई करण्यास येथें येईल. हें ध्यानांत ठेवल्यास आपण शहाणपणानें वागूं आणि रिकाम्या गप्पा झोंकण्याचें गोडवें काम सोडून देऊं. पुढें काय होईल हें आज कळत नाहीं हें खरें, पण जर आपलें कर्तव्य करण्यास तुह्मीं दिरंग लावलात व जें केलें पाहिजे तें करण्यास नाराजी झालांत तर भविष्यकालीं आपला सफाई नाश होणार हें सांगण्यास कोणी जोशी नको आहे."

या भाषणाचा एवढाच परिणाम झाला कीं, चारीडीमस नामक क्रूर सेनानी देऊन कांहीं पेंढारी लोक अथीनियन लोकांनीं खर्सोनाझ येथें पाठविले!! फिलिप आपला शत्रू होण्यास समर्थ नाहीं अशी अथीनियन लोकांची कल्पना होती. त्यांस भय वाटे तें परशियाचे महाराजाचें. मॉराथान व सालामिस येथील पराभवाचा सूड घेण्याकरितां परशियन लोक येणार अशी कंडी फिलिपनेंच पिकवून दिली. फिलिपनें पैसा देऊन वश केलेले कित्येक लोक प्रत्येक ग्रीक संस्थानांत असत. शिवाय सगळ्यांत

मुख्य हें कीं, अर्थीनियन लोकांमध्यें सध्या अविश्वास आणि उदासीनता यांचें वारें शिरलें होतें. तेव्हां डेमास्थेनीसचें स्वदेशप्रीति जागृत करणारें भाषण कार्यक्षम झालें नाहीं यांत आश्चर्य काय? लोकसत्ताक राष्ट्रांचें धुरीणत्व अथेन्सनें घ्यावें हें डेमास्थेनीसचें प्रथमपासून ह्मणणें होतें. पण ऐकतो कोण?

वरील भाषण झालें, त्यानंतर सुमारें एक वर्षानें ऱ्होड्स नामक बेटांकडून अर्थीनियन लोकसभेपुढें असा अर्ज आला कीं तेथील लोकपक्षास अथेन्सचें साहाय्य असावें. ३१४ वेळां हें बेट अथेन्सच्या कह्यांतून गेलें होतें ३५८ मध्यें अथेन्सच्या चेरिज् नामक सेनापतीनें येथें जुलुम करून फारच पैसे उकळिले होते ह्मणून या बेटानें अग्रणी होऊन त्या वेळची लढाई * सुरू केली व अथेन्सची सत्ता त्या योगानें पुष्कळ कमी झाली हें अर्थीनियन जानपदांच्या ध्यानांत होतें. हा त्यांचा दुराग्रह नाहींसा करून ऱ्होडस् येथील लोकपक्षास मदत देववावी असा डिमास्थेनीसचा हेतु पुढील भाषणावरून व्यक्त होईल.

"अर्थीनियन लोकहो! आजपर्यंत तुह्मी अनेक लढाया केल्या त्यांत कांहीं लोकसत्ताक राष्ट्रांशीं व कांहीं श्रेष्ठसत्ताक राष्ट्रांशीं झाल्या, हें तुह्मांस सांगावयास नको आहे. लोकसत्ताकराज्यांशीं कांहीं खासगत कारणास्तव, सरहद्दीच्या तंट्याचा निकाल करण्याकरितां, आपल्या अन्नूचें संरक्षण करण्यासाठीं, अगर ग्रीसचें धुरीणत्व ठरवावें या हेतूनें लढाया झाल्या. अल्पजनसत्ताक राष्ट्रांशीं ज्या लढाया झाल्या त्यांमध्यें राज्यपद्धति अगर स्वातंत्र्य, कायम ठेवण्याकरितां तुह्मी लढाईस तयार झालां. याकरितां माझी सदैव अशी इच्छा आहे कीं अल्पजनसत्ताभिलाषी ग्रीक लोक आपले स्नेही असण्यापेक्षां, लोकसत्ताक राज्यांतील सर्व ग्रीक लोक आपले शत्रू असणें बरें. कारण स्वतंत्रताप्रिय राष्ट्रांशीं तह करण्यास फारशी खटपट नलगे आहे, पण सत्ताभिलाषी अल्पजनांशीं स्नेह स्वप्नांत सुद्धां नको, कारण त्यांच्या स्नेहाला धरबंदच नाहीं. सत्तैषी अल्पजनांचा बहुजनांशीं स्नेह असणें अशक्य आहे. ऱ्होडीयन व इतर लोक दास्यस्वशृंखलेंत सांपडले जात असतां आपली राज्यपद्धति सुरक्षित कशी राहील याची शंका तुमच्या मनांत येत नाहीं, हें मोठें आश्चर्य नव्हे काय? अल्पजनसत्ता प्रबल झाली असतां लोकसत्ताक राज्यें नष्ट होण्याची वेळ आलीच असें समजावें. लोकसत्ताक राज्याला ते भिणारच, कारण त्यांस वाटत असतें कीं, हीं राज्यें कायम आहेत तोंवर लोकस्वातंत्र्याचे दीक्षीत कायम आहेत, व आपल्या सत्तेस धोका आहे. साधारण अपराधी लोक व्यक्तिविशेषाचे शत्रु असतात. पण अल्पसत्तेंत राज्यपद्धति नेणारे लोक

* अंतर्राष्ट्रीय.

स्वातंत्र्यप्रिय लोकांचे हाडवैरीच होत. हें ध्यानांत धरून आपल्यास मदत मागण्याकरितां हे लोक आले आहेत त्यांचें मागणें कबूल करा."

सारांश, अल्पसत्ताक राज्य म्हणजे दास्यत्व व तें ग्रीकलोकांच्या समजुतीविरुद्ध, अशी डेमास्थेनीसची कल्पना होती. वरील भाषणांत तो पुढें म्हणतो "इतर सर्व लोकांस आपल्या उघड शत्रूंबरोबर लढाई करावयाची असते, पण आह्मांस पहिल्या प्रथम एक जास्ती त्रासदायक युद्ध करावें लागत आहे. आमच्या संस्थानाचें पद्धतवारीनें अकल्याण करणाऱ्या एका पक्षाशी आह्मांस वाग्लढाई करावयाची आहे. आपल्या वाडवडिलांपासून चाललेली पद्धत सोडून दुष्ट पद्धतीला आश्रय देणाऱ्या लोकांचे स्वातंत्र्याचे हक्क काढून घेऊन त्यांची सभेंत येऊन बोलण्याची परवानगी काढून घेतल्याखेरीज आमचा अंतस्थ रोग नाहींसा होणार नाहीं."

डिमास्थेनीसचें कांहीं एक चाललें नाहीं. कृतघ्न ऱ्होडद्वीपस्थ लोकांविरुद्ध अथीनियन लोकांचा राग असल्यामुळें श्रेष्ठ न्यायपद्धतीचा स्वीकार न करण्याविषयींचा त्यास मोह पडला व ऱ्होडियन लोकांस अथीनियन लोकांनीं मदत दिली नाहीं.

---

## भाग ४.

फोकियन लोकांचा नायक आनोमार्कस याचा थेसलीमध्यें फिलिपनें पराजय केल्या दिवसापासून सर्व ग्रीक जगांत मासिडोनिआच्या राजाबद्दल धास्ती उत्पन्न झाली होती. त्याचें राज्य जोरावर होत चाललें होतें. तथापि एक दोन वर्षांत फिलिपनें कांहीं दंगाधोपा केल्याचें ऐकू आलें नाहीं म्हणून त्याच्या भरभराटीचा कळस झाला, आतां तो पुढें ढवळाढवळ करणार नाहीं आणि शांतता ठेवील अशी लोकांची खातरी होऊन, आपल्यास आतां श्रम करावयास नकोत अशी अथीनियन लोकांस बळकट आशा उत्पन्न झाली होती. फिलिप बलाढ्य होता हें खरें पण अथेन्सशीं सामना ठोकावयाची त्याची अजून तयारी झाली नव्हती. त्याचें सैन्य तयार होतें, वसूल पुष्कळ येत असे; पण त्याचें आरमार अजून जय्यत नव्हतें.

कसें तरी करून शांतता असावी व लढाईची व कर देण्याची आपल्यावरील पिडा टळावी अशी आशा करणारे पुष्कळ श्रीमंत लोक फिलिपच्या बाजूचे होते हें खरें पण अथीनियन लोकांचें आरमार अनावर होतें म्हणून व जरी त्यानें पुष्कळ अथिनियन शहरें काबीज केली होतीं तरी आलिंथियन* व अथिनियन लोक एकत्र झाल्यास आपला टिकाव लागणार नाहीं असें त्यास पक्कें ठाऊक होतें. आलिंथियन लोकांचें उत्तरेकडे ३२ शहरांनीं घटित असें एक बलाढ्य संभुवन असून, त्यांनीं स्पार्टा अगर अथेन्स यास

---

* मागें सांगितलेलें संभुवन याचा उदय ३८२ सालीं झाला होता.

पुष्कळ दिवस दाद दिली नव्हती. स्पार्टानें त्यांचा महच्छ्रमानें पराजय केला होता व १० वर्षांनंतर ह्मणजे ३६८।३६७ मध्यें अथेन्सनें त्यांचे पुष्कळ प्रांत हिरावून घेतले होते तरी आलिंथस ३५८ मध्यें श्रीमंत होतें व वेळ पडल्यास रणांगणांत प्रचंड सेना आणण्याची त्यास शक्ति होती. फिलिप जोरावर होत आहे हें पाहून त्यांनीं अथेन्सकडे तहाचें बोलणें लावलें होतें तें अथेन्सनें नाकारलें ह्मणून त्यांनीं फिलिपकडून एक, दोन प्रांत मिळवून त्याच्या मदतीनें अथेन्सची शक्ति कमी करण्याचा विचार करून ही गोष्ट अमलांतही आणली. पण ३५२ मध्यें त्यांनीं आपली पद्धति बदलली. फिलिपची शक्ति बालसूर्यप्रकाशाप्रमाणें हळू हळू वाढत होती हें पाहून त्यांनीं अथेन्सशीं सामना करण्याचा पुनः घाट घातला. अथेन्सही तहास राजी होते. पण उघडपणें फिलिपशीं विरुद्ध होण्याचें आलिंथियनांस आवडलें नाहीं ह्मणून त्यांस निश्चितपणानें तह करतां येईना. दोन वर्षें लोटलीं. फिलिपनें ३५० मध्यें कांहीं एक खुसपट काढून आलिंथियन लोकांचीं एकापाठीमागून एक अशीं शहरें तो घेऊं लागला. तेव्हां जागे होऊन त्यांनीं अथेन्सकडे पुनः तहाचें बोलणें लावलें. अथीनियन लोकांनीं तें मान्य करून फिलिप यास त्याच्या विश्वासघाती स्वभावाबद्दल शिक्षा करावी असा बेत केला. या वेळीं डिमास्थेनीसनें आपलीं प्रसिद्ध तीन 'आलिंथिआक्स' नामक सर्व प्रसिद्ध भाषणें केलीं. लोकमताचा ओघ त्याकडे होता हें खरें, पण त्याच्या भाषणावरून लोकांस काम करावयास नको होतें असें स्पष्ट दिसतें. त्यांनीं दोन वेळां पेंढारसैन्य पाठविलें पण त्याचा कांहीं विशेष उपयोग झाला नाहीं.

डिमास्थेनीस आपल्या प्रथम भाषणांत ह्मणाला: "प्रत्येक राष्ट्राच्या साधेभोळेपणाचा फायदा घेऊन फिलिप वाढत चालला आहे. पण लटालटी व कपटप्रयोग यांच्या साह्यानें बळकट झालेला मनुष्य एखादा यःकश्चित पराजय झाला कीं नाश पावून जातो हें ध्यानांत आणा. तुह्मीं आपलें कर्तव्य केलें नाहीं ह्मणून तो मोठा झाला आहे. आपला नीति तुह्मी न सोडल्यास फिलिपचे सर्व साह्यकर्ते अशक्त व बेभरवशाचे आहेत असें दिसेल इतकेंच नाहीं तर त्याची स्वतांची सुद्धां अतिशय तारांबळ आहे असें दिसून येईल. मासिडान स्वतां अशक्त असून तेथील लोकांस व फिलिपास एकच गोष्टी आवडतात असें नाहीं. त्याला कीर्ति पाहिजे आहे व ती मिळविण्याकरितां वाटेल ती खटपट व धाडस करण्यास तो तयार आहे. या धाडसी कृत्यांत मासिडोनियन लोकांस कांहीं एक फायदा नाहीं. ते फक्त श्रमाचे अधिकारी आहेत तेव्हां त्यांना फिलिप आवडत नाहीं ही एक गोष्ट. दुसरी, फिलिप यास अनुभवशीर व शूर सरदारांचा कंटाळा आहे, कारण त्याच्या यशाला हे सेनापति भागीदार होतात! सारांश त्याच्या-

जवळ गुणांची चहा नाहीं. तिसरी गोष्ट अशी आहे कीं, फिलिप पहिल्या प्रतीचा दारूबाज, दुर्व्यसनी, व हलकट असल्यामुळें त्याच्या दरबारांत सद्गुणी व इमानी गृहस्थांची मुळींच रया नाहीं. त्याच्या येथें पुंड व हांजी हांजी करून लाळ घोटणाऱ्या गृहस्थांची सध्या चलती आहे. या सर्व गोष्टींवरून फिलिपची अंतस्थ शक्ति किती बळकट असेल याचा अ- न्दमास करितां येण्यासारखा आहे. सारांश, तुह्मी आपलें कर्तव्य अंतःक- रणपूर्वक बजावल्यास फिलिपचा पाडाव करावयाला एक क्षणमात्रही उशीर लागणार नाहीं. याकरितां स्वतां घस सोसून लढाईस जाऊन जें काम करणें तें योग्य वेळीं करा ह्मणजे आपल्या राष्ट्राचें वैभव कायम रा- हील. नाहीं तर आलिंथसचा पाडाव होऊन त्याची शक्ति वाढेल आणि आ- टिकावर* हल्ला करण्यास त्याला काडीइतकी सुद्धां शंका वाटणार नाहीं." हें व दुसरें भाषण ऐकून अथिनियन लोकांनीं कांहीं पेंढार सैन्य पाठविलें. या सैन्यास थोडासा जय आल्याबरोबर सेनापतीनें फुशारकीनें ही बातमी स्वनगरीस पाठविली; तेव्हां जिकडे तिकडे आनंद होऊन फिलिपला आतां चांगलाच मार द्यावयाचा असे शब्द लोकांत जारीनें पसरूं लागले. ते- व्हां डिमास्थेनीसनें उठून आपल्या तिसऱ्या भाषणांत सांगितलें कीं "हें बोलणें वेडगळपणाचें आहे. आपलें स्वतांचें संरक्षण, आणि आपल्या मि- त्रांचें संरक्षण आधीं करूया आणि मग फिलिपला ठोक द्यावयाच्या गोष्टी बोलूं. अथिनियनहो! सध्यां पैशाची तूट आहे, ती काढून टाकण्याकरितां हल्लीं उत्सवप्रीत्यर्थ जी रक्कम खर्च होत आहे, तिचा लढाईच्या कामीं उपयोग करून त्यापासून सैनिकांस पगार देण्याची व्यवस्था करूया व आलिंथस—जें बळीं पडण्याच्या बेतांत आलें आहे—त्याचें रक्षण करूया. उत्सवप्रीत्यर्थ खर्च होणारी रक्कम दुसरीकडे लावली तर पुष्कळ लो- कांस वाईट वाटेल, पण पुढील फायदेशीर लाभाकरितां क्षणमात्र टिकणा- ऱ्या सुखाचा त्याग करणें हें शहाणपणाचें कृत्य आहे, व आपण सर्व शहाणे आहांत. आपल्या पूर्वजांनीं किती दूरदर्शीपणानें राज्यकारभार केला? आपल्या शहाणपणानें व कार्योत्साहानें ४५ वर्षेपर्यंत ग्रीसवर स- त्ता ठेविली, खजिन्यांत १०,००० टॅलेंट (२५०० रुपये ह्मणजे एक टॅलेंट) शिलक ठेविली, खुष्कीवर व समुद्रावर हजारों जयपताका उभारल्या, जिचा आपल्यास कधींही मत्सर उत्पन्न होऊं शकणार नाहीं अशी स- त्कीर्ति मागें ठेविली, आपल्या नगरीमध्यें कित्येक उत्कृष्ट, सुंदर, व भव्य इमारती बांधून ठेवल्या. आणि सर्वांशीं समतेनें वागून ईश्वरचरणीं निष्ठा ठेवली. इतकें असून त्यांचें वर्तन किती साधेपणाचें असे? हा कर्तव्य- दक्षतेचा परिणाम नव्हे काय? आतां आपल्या वेळची स्थिति पाहूं या.

---

* अथेन्स ज्याची राजधानी होतें तो प्रांत.

आपलें बाहेरील राज्य सर्व नष्ट झालें, आपले जहांबाज शत्रूंची (स्पार्टा व थीब्स) इतर कारणानें दुर्दशा झाली असतांही ग्रीस देशाचें स्वामित्व घेण्याची ताकद आह्मास नाहीं, खजिन्यांत एक दमडी सुद्धां शिल्लक नाहीं, १५०० टॅलेंट्स खर्च करूनही आपला पराजय होत आहे, सर्व मित्र नष्ट झाले, शहराचे तट नादुरुस्त झाले, रस्ते भिकारी दशेस पावले आणि ज्यांच्या हातांत हीं कामें करण्याचा अधिकार होता ते मात्र गरीबी सोडून श्रीमंत झाले! अशी आपली स्थिति कशानें झाली? आपल्या हलगर्जीपणामुळें. तर सोडा तो आळस, तो हलगर्जीपणा, व ती कद्रूपणाची इच्छा; आणि धैर्यानें आलिंथसास मदत करून आपण आपलें कर्तव्य बजावलें व रानटी शत्रूचा उच्छेद केला असें जगास दाखवा. दिरंगाई लावण्याची ही वेळ नाहीं. दैव तुमचें साह्य करोत." शेवटीं अथेन्सनें २००० अथीनियन लोक पाठविले. पण त्यांचा विशेष उपयोग झाला नाहीं; कारण आलिंथस शहरामध्येंच घरभेद होऊन फिलिप यास आलिंथसचे दरवाजे सोन्याच्या किल्लीनें उघडतां आले. त्यानें ३२ शहरें उध्वस्त करून टाकून सर्व प्रांत आपल्या ताब्यांत घेतला.

अशा धनाढ्य, सशक्त ग्रीक शहरांचा समूळ नाश पाहून तरी ग्रीशियन लोकांनीं परस्परांमधील मत्सर व बेभरंवशीपणा सोडून देऊन इतर ग्रीक लोकांच्या संरक्षणार्थ संहति प्रयत्न करावयाचा होता. पण दैव विचित्र तेव्हां तसें कोठून होणार?

या सुमारास डिमास्थेनीसच्या आयुष्यचरित्रांत एक गोष्ट घडली, त्यावरून सुधारलेल्या, सभ्य, सद्वर्तनी, दयाळू, व उदार अथीनियन लोकांमध्यें सुद्धां घाणेरडे व असभ्य प्रकार श्रीमंत लोकांकडून होत असत असें दिसतें. कोणा श्रीमंत मनुष्याचें एखाद्याशीं राजकीय संबंधानें अगर इतर कारणांनीं वांकडे असल्यास, गरीब शत्रूचा तो वाटेल तसा, पाहिजे तेथें सूड घेण्यास कधींही कमी करीत नसे. असल्या व्यक्ती अथेन्स शहरांत पुष्कळ असून ते आपला काल हलकट व रानटी धिंगामस्ती करण्यांत घालवीत असत. असल्या विजातीय व्यक्तींपैकींच मिडियस नांवाच्या एका श्रीमान लक्ष्मीश्वराचें व डिमास्थेनीसचें वांकडें पडलें होतें कारण इतकेंच कीं डिमास्थेनीसच्या लबाड व कृतघ्न पालकांचा व मिडियसचा स्नेह होता. हें ध्यानांत ठेवून हा लक्ष्मीपुत्र एक दिवस डिमास्थेनीसच्या घरांत शिरून त्याच्या तरुण बहिणींच्या देखत वाटेल तसले बीभत्स शब्द बडबडला. फिर्यादीमध्यें डिमास्थेनीससारखा निकाल झाला. मग काय पुसतां! मीडियस आपल्या प्रतिपक्ष्यास पाण्यांतच पाहूं लागला. पुढें ३४८ मध्यें *युबिआची लढाई निघाली तेव्हां डिमास्थेनीस त्या बेटांत

* येथें या वेळीं फिलिपच्या सल्यानें कांहीं लोकांनीं देशाविरुद्ध बंड उभारलें होतें.

न राहतां कांहीं धर्मसंबंधीं उत्सवाच्या निमित्तानें परत आला, तेव्हां मीडियसनें त्याच्यावर आरोप आणला कीं लढाईची स्वारीला खटपट करावयास नको ह्मणून हा भेकडासारखा परत आला! उत्सवाच्या अध्वर्यूस एक मोठा रेशमी व जरतारी झगा व सुवर्णमुगुट घालावा लागत असे, त्याप्रमाणें ह्या जिनसा करावयास कारागिराकडे टाकल्या होत्या. तेथें त्या तयार होत आहेत तों मीडियस कारखानेवाल्याच्या येथें जाऊन तेथें या दोन्ही जिनसांचीं त्यानें घाण केली, प्रेक्षक मंडळी बसली असतां त्यांच्या देखत डिमास्थेनीसला दोनचार गुद्दे दिले आणि परीक्षकांस लांच देऊन त्यास मिळणारें बक्षीसहीं हिरावून घेतलें. फिर्याद झाली त्यांत डिमास्थेनीसनें आपसांत खटला तोडून मीडियसकडून नुकसानीबद्दल कांहीं पैसे घेतले असें ह्मणतात. सारांश गरीब परंतु इमानी माणसाचा अथेन्स शहरीं निभाव लागणें कठीण होतें असें यावरून दिसतें!

आलिंथसचा पाडाव ३४७ त झाला. फिलिपच्या आश्चर्यकारक विजयमालेनें ग्रीसस्थ लोक दडपून जाऊन चींचीं करावयास लागले. अथेन्सनें अत्यंत अपमानदायक तह घाईरेपणानें करून टाकला. ह्या नगरींतील अनेक लोक फिलिपचे पगारी मुनीम होऊन त्याच्या पक्षानें उघडपणानें भांडूं लागले. ह्या अनर्थकारक समयांत दुसरी अत्यंत नेटाची अशी एक गोष्ट होती कीं आलिंथियनच्या लढाईमध्यें पुष्कळ अथीनियन लोक फिलिपच्या हातांत सांपडले होते, त्यांचे नातेवाईक तह करून आमचीं माणसें सोडवून आणा ह्मणून ओरडूं लागले. ह्याच्या अगोदर सर्व ग्रीस संस्थानांत वकील पाठवून त्यांस फिलिपविरुद्ध उठविण्याचा अथेन्सचा बेत इतर संस्थानांच्या अविश्वासानें व अदूरदृष्टीनें फसला गेला होता. तेव्हां तहाचें मागणें जोरानें पुढें आलें, व कशाही अटी कबूल करून तह करावा असें लोकांचें म्हणणें पडलें.

ह्या प्रसंगीं एस्चिनीस नामक प्रतिस्पर्ध्याचा उदय झाला. हा मनुष्य जात्या बुद्धिवान असून मोठा उद्योगी होता. वक्तृत्वास लागणारे सर्व गुण ह्याच्या अंगांत स्वभावतःच होते. ग्रीक संस्थानांत संक्षोभन करण्याकरितां जे वकील पाठविले होते त्यांत हा एक असून त्यानें 'रक्तलोभी व रानटी फिलिप'च्या विरुद्ध जोरदार भाषणें केलीं होतीं. आशातृष्णेचा तडाखा असा कांहीं भयंकर असतो कीं हाच एस्चिनीस पुढें म्हणजे १२ वर्षांच्या आंत, ग्रीक लोक व त्यांचें स्वातंत्र्य यांच्याविरुद्ध भयप्रद बेत करणाऱ्या फिलिपचा दासानुदास होऊन राहिला!! असो, तहासंबंधानें जी खटपट झाली त्यांत एस्चिनीस व डिमास्थेनीस यांनीं प्रमुखत्वानें पुढाकार घेतला, व ज्या वैराग्नीमुळें सभांगणामध्यें उभयतांचे अनेक वाग्युद्ध प्रसंग झाले त्यांची ठिणगी यावेळेस पेटली गेली. तहाची हकीकत

आपल्यास मिळते ती या दोन महावक्त्यांच्या भाषणांतून. आतां ह्मणजे १९ व्या शतकांत या तहाचा विचार केला तर अथेन्सनें ढोबळ चूक केली असें आपल्यास वाटेल. पण त्यावेळची स्थिति मोठी घोटाळ्याची होती. फिलिपविरुद्ध लढण्यास ग्रीस संस्थानें तयार नव्हतीं, एकट्यानें लढाई करण्याचा अथेन्सला दम नव्हता, आपले नातेवाईक सोडविण्याचा नेट त्यांच्यामागें लागला होता आणि तशांत फिलिपची सौजन्याची व आर्जवाची वागणूक; अशी प्रसंगपरंपरा असल्यावर लढाई न आवडणाऱ्या अथेन्सनें तह केला यांत कांहीं आश्चर्य आहे काय? स्पार्टा, थीब्स, फोकिस, व अथेन्स यांनीं एकत्र व्हावयाचें, पण त्या नगरांच्या मागील जुलुमी वर्तणुकीमुळें स्पार्टावर कोणाचा विश्वास नव्हता. थीब्स व फोकिस यांमध्यें यावेळीं 'धर्मयुद्ध' चाललें होतें. फोकिसचा पराभव करावा हा थीब्सचा मूळ हेतु होता, त्यामुळें त्यांचें व अथेन्सचें एकमत होण्याचा संभव नव्हता, कारण फोकिस व अथेन्स यांचा फार दिवसांचा घरोबा होता. 'फोकिअन्स हे धर्मद्रोही म्हणून ग्रीक लोकांचे शत्रु आहेत, त्यांचा नाश करण्याकरितां पाहिजे असल्यास मी मदत देतों' असा फिलिपचा निरोप आल्याबरोबर थीब्सनें ह्या ह्मणण्यास रुकार दिला. हें कळल्याबरोबर अथेन्सनें थर्मापिली (धर्मपुरी) चा प्रसिद्ध घाट संरक्षण करण्याकरितां सैन्य पाठविलें त्यास फोकियनांचा सेनापति आंत येऊं देईना. असा प्रसंग आल्यावर अथेन्स विचारें काय करणार? 'फोकियन लोकांव्यतिरिक्त अथीनियन व त्यांचे दोस्त यांच्याशीं तह करण्यास मी कबूल आहें' असा फिलिपनें अथेन्सला निरोप पाठविला. फिलिपचा पेंच असा होता कीं अथेन्सशीं तह करावा, फोकियनांचा सफाई नाश होऊन थर्मापिलीचा घाट आपल्या ताब्यांत यावा व थीब्सची मैत्री जोडावी, पण हे सर्व दूरदर्शी हेतु स्वलाभद्रष्ट्या ग्रीक लोकांस कसे समजणार? तह झाला त्यांत फिलिपनें आपला आग्रह सिद्धीस नेला. तहावर फिलिपची सही घेण्याकरितां पेला* येथें मंडळी गेली. फिलिप थ्रेसमध्यें होता. त्यानें तेथील राजास (अथेन्सच्या दोस्तास) शह देऊन जेरीस आणलें होतें. आतां येवढ्याशा कारणाकरितां तह नको ह्मणण्याचें धैर्य अथेन्सला नव्हतें. 'फोकियन लोकांचें फिलिप संरक्षण करणार व थीब्सचा नाश करणार' अशा कंड्या पिकवून फोकिसचें नांव तहांतून काढून टाकिलें, आपल्यास कोणी त्राता नाहीं असें पाहून फोकियन सेनानीनें थर्मापिली फिलिपच्या स्वाधीन केली व आपण निघून गेला. सर्व फोकिस प्रांत उजाड पडला व अथेन्सची खातरी झाली कीं आपल्यास आपल्या नीच मुत्सद्यांनीं फस-

---

* फिलिपची राजधानी.

विलें. 'हा तह घाईट व अपमानकारक आहे, तरी तो मोडणें निव्वळ वेडे-
पणा होईल' असें डिमास्थेनीसनें सांगितलें.

'या योगानें आपल्यावर सर्व ग्रीशियन लोक तुटून मात्र पडतील. आतां मेहेरबानी करून येवढेंच करा कीं फिलिपला जास्त प्रांत काबीज करूं देऊं नका,' अशी त्यानें आपल्या देशबांधवांची प्रार्थना केली.

---

# भाग ५.

## फिलिपच्या विरुद्ध राजकारण.

**सत्यसंकल्पाचा दाता भगवान । सर्व करी पूर्ण मनोरथ ॥ १ ॥**

३४६ च्या तहानें फिलिपची सत्ता व वजन हीं फारच वाढलीं. त्यास ग्रीशिअन लोकांचे अधिकार मिळाले व इतर ठिकाणीं ढवळाढवळ करण्यास चांगलेंच फावलें. आपल्यास फायदा करून घेतां येईल इतक्या मात्र अटी तो मानण्यास कबूल होता, ह्मणून अथेन्समध्यें त्याच्याविरुद्ध भीतिजन्य राग उत्पन्न झाला. त्याचा आतां परशिआकडे डोळा वळला. पण बाकीचे सर्व ग्रीक लोक एकवट करून परशियावर स्वारी करावयाचे वेतापूर्वी ग्रीसमध्येंच आपला पाय चांगला शिरला आहे अशी व्यवस्था करणें त्यास जरूर वाटलें. हा हेतु साध्य करण्याकरितां अथेन्सला एकाकी करून खरसोनीसमधील त्या नगरीच्या वसाहती नाहींशा कराव्या व त्यांचा व्यापार बंद पाडावा या उद्योगास तो लागला. स्पार्टाच्या सत्तेस त्रासलेलीं पिलापोनीससमध्यें पुष्कळच शहरें होतीं. दुसरीकडून आपल्यास मदत मिळण्याचा संभव नाहीं असें पाहून ते फिलिपास शरण गेले. त्यानेंही मदत देण्याचें कबूल केलें. अथेन्सला याविरुद्ध बोलतां येईना. पण स्पार्टाच्या नाशानें फिलिपची सत्ता जास्तच वाढणार असें त्यांच्या लक्ष्यांत आलें. तेव्हां डिमास्थेनीसनें अथिनियन लोकांचें मन वळवून आपल्यास फिलिपविरुद्ध पिलापोनीससमध्यें वक्तृत्व करण्यास पाठवावें अशी योजना केली. पिलापोनीससमध्यें जाऊन फिलिपच्या विश्वासघाताविषयीं पुष्कळ ठिकाणीं तो बोलला. अनेक ठिकाणीं त्यानें सांगितलें कीं 'स्पार्टाचा पाडाव करण्याकरितां तुह्मी फिलिपची सत्ता जास्त वाढवीत आहांत ह्याचा परिणाम सर्व ग्रीस देशास दास्यत्व येईल हें आलिंथस, फोकिस ह्या नगरांच्या स्थितीवरून तुमच्या कसें ध्यानांत येत नाहीं? लोकसत्ताक व एकसत्ताक राष्ट्रांमध्यें खरा स्नेह असणें दुरापास्त गोष्ट आहे.' त्याच्या बोलण्यानें पुष्कळ लोकांस आनंद झाला हें खरें. पण तटस्थ लोकांस पर-

राज्याच्या अमलाखालीं राहण्याची संवय लागल्यामुळें त्याच्या बोलण्याचा त्यांच्यावर मुळींच परिणाम झाला नाहीं. अप्रत्यक्ष परिणाम इतकाच झाला कीं फिलिपनें अथेन्स शहरीं वकील पाठवून असें सुचविलें कीं 'मा-झ्याविरुद्ध तुमचा संशय निष्कारण आहे व नुकत्याच झालेल्या तहानें निर्वैर झालेल्या देशांत डिमास्थेनीसच्या बोलण्यानें पुनः आग लाग-ण्याचा संभव आहे.' तेव्हां पिलापोनीसचे वकील तेथें होतेच, त्यांनीं सांगितलें कीं स्पार्टाचा व तुमचा स्नेह आहे, आह्मांस स्पार्टापासून भीति आहे; ह्मणून आह्मी फिलिपचा आश्रय करीत आहोंत, यास तुमची हरकत नसावी.' हें बोलणें ऐकल्यावर त्यानें फिलिपच्या विरुद्ध एक जंगी भाषण केलें, त्यांत 'फिलिप ह्या कालांतील प्रचंड अभवादी (प्रथम भांडण काढून नंतर आपण दुसऱ्याची वस्तु लाटणारा) असून त्यानें सर्व ग्रीक लोकांस शृंखलाबद्ध करण्याचें योजलें आहे, तेव्हां सावध रहा;' असें सांगून तो पिलापोनीसच्या वकिलाकडे वळून म्हणाला: "स्वतःच्या प्रांतांपैकीं कांहीं प्रांत व अ-थीनियन लोकांचे पाटीडिया इत्यादि प्रांत आलिंथस राष्ट्रास फिलिपनें दिले त्या वेळीं या रानटी राजाविरुद्ध जर कोणी आलिंथसमध्यें बोलला असता तर त्याचा कोणी लक्ष लावून विचार केला असता काय? आप-ल्यास हा राक्षस स्वदेशांतून हांकून लावील असें आलिंथिअन लोकांस वाटलें होतें काय? कोठें आहेत ते आलिंथियन लोक आतां? त्यांची राखरांगोळी होऊन तो प्रांत उजाड पडला हें तुह्मी पाहिलेंच आहे. सारांश स्वायत्तराजांवर स्वतंत्र लोकांनीं बिलकूल विश्वास ठेवणें उपयोगी नाहीं. तट, दुर्ग, भिंती, खंदक, इत्यादि गोष्टी संरक्षणास अवश्य आहेत हें खरें, पण जुलूमी राजाविरुद्ध एक शस्त्र नेहमीं स्वातंत्र्यप्रिय लोकांनीं वाळगलें पाहिजे. कोणतें शस्त्र तें? अविश्वास! यास आपल्या जवळ करा, त्याची चिकाटी सोडूं नका. येवढ्यानें मात्र तुमचा नाश होणार नाहीं. तुम्हांस स्वातंत्र्य पाहिजे ना? जर पाहिजे तर तें, स्वातंत्र्य नष्ट करणाऱ्या फिलिपकडून, तुम्हांस कधीं तरी मिळेल काय? मग कां वे-ड्यासारखे फिलिपकडे दीनवदन होऊन जातां?" अथीनियन लोकांकडे वळून तो ह्मणतो 'थर्मापिलीचा प्रांत फिलिपच्या एकदां स्वाधीन झाला ह्मणजे थीब्स लोकांचा नाश व फोकियन लोकांचें संरक्षण करून आह्मांस आफिपालिसबद्दल यूबिया व आरोपस फिलिप देणार होताना? धर्मयुद्धाचा शेवट कसा झाला तें सर्वांस माहीत आहेच. फिलिपसारख्या माणसावर विश्वास टाकणें हें अति वाईट काम आहे. हें आतां सर्वांच्या लक्षांत येऊं लागलें आहे. मागें त्याचें बोलणें खरें मानलें त्याचा फायदा हा झाला कीं फिलिपला आटिकाला अगर पिलापोनी-ससमध्यें जाण्याला कांहीं एक आडकाठी राहिली नाहीं! आणि आ-

पर्ले स्वतःचें संरक्षण करण्याची पाळी आम्हांस आली! हा अतिविश्वासाचा परिणाम बरें! अल्पसत्ताक अगर बहुसत्ताक या दोन पक्षांमध्यें कलह नसून फिलिप व त्यांचे वैरी यांमध्यें लढाई सुरू झाली आहे, इतकें महत्त्व फिलिप यास प्राप्त झालें आहे, आणि त्यास कारण आमचा अविचारी विश्वास हें होय.'

पुढील सालीं फिलिपियन पक्षाचा मुख्य वक्ता एस्चिनीस याच्यावर गुन्हा शाबीत करून त्याची नापत करावी म्हणून डिमास्थेनीसनें केलेला प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं. असो; ३४३-४२ च्या सुमारास फिलिपनें आपला मोर्चा थ्रेसीयन खर्सोनिझकडे वळविला. हा प्रांत काबीज करून काळया समुद्रावरील नाकें 'बिझान्शियम हें घेतलें ह्मणजे अथेन्सचें आरमार खालसा होऊन त्या नगरीस अन्नाची पंचाईत पडेल व सहजच तीं आपल्या ताब्यांत येईल अशी त्याची खातरी होती. फिलिप तिकडे काय करीत आहे हें पाहण्याकरितां डायोपीथीसची रवानगी मागेंच केली होती. त्यानें मासिडोनियाच्या प्रांतावर हल्ला करून चार-पांच ठाणीं घेतलीं; तेव्हां फिलिपनें अथेन्सच अर्थीनियन लोकांकडे तक्रार केली. फिलिपचे पक्षपाती होते त्यांनीं डायोपीथीसला परत बोलवावें असा आक्रोश केला. डायोपीथीस हा एका भयंकर लुटारूच्या राजाचा पाडाव करीत आहे. तेव्हां त्यास परत न बोलावतां त्याच्या मदतीस, पैसे देऊन अर्थीनियन लोकांचें सैन्य पाठवावें अशा स्पष्ट अर्थाचें डिमास्थेनीस यानें एक युक्तिबद्ध भाषण केलें.

" पहिल्याप्रथम आपल्या शत्रूचा समाचार घ्या आणि नंतर मग आपल्या सेनापतीचा जाब घ्या. फिलिपच्या प्रांतावर आमच्या सेनापतीनें हल्ला केल्याबरोबर आमच्या विरुद्ध तक्रारी यावयाहें ठीकच आहे. परंतु आजपर्यंत फिलिपनें केलेल्या अकांड तांडवाचा कोणी विचार केला आहे काय? कांहीं लोक ह्मणतात कीं 'धड तह तरी असूं द्या अगर लढाई तरी चालूं द्या.' फिलिपनें जर पहिल्यापासून आमचे सर्व प्रांत हिरावून घेतले आहेत, इतर ग्रीक व अनार्य लोकांचे प्रांत लुबाडून घेऊन आह्मांवर चढाई करून येण्याचा जर त्याचा इरादा आहे तर लढाई करा अगर तह नीट ठेवा, या वाक्याचा अर्थ कांहीं तरी होतो काय? बिझान्शियमवर हल्ला करण्याची त्याची तयारी झाली आहे. तेथील लोक फिलिपविरुद्ध लढण्यास असमर्थ आहेत हें तुम्हांस माहीत आहेच. आपण त्यांस मदत केली नाहीं तर त्यांचा चुराडा झाला ह्मणून समजा. खर्सोनीझवर तो पुढें हल्ला करणारच. अशा वेळेस आहे तें अथेन्सचें सैन्य कमी करण्यासारखा

* येथें सध्यां 'कान्स्तांतिनोपल' आहे.

दुसरा कोणताही मूर्खपणा नाहीं. सैन्य कमी करण्याचा विचार एका बाजूस ठेऊन देऊन, वाढवितां येईल तितकें तें वाढवा तरच तुमची धडगत आहे. ग्रीक लोकांनीं जीवंत रहावें किंवा मरावें याबद्दलचा हा कलह आहे. पण त्याचे पक्षपाती लोक अथेन्समध्यें जोंपावेतों आहेत, जोंपर्यंत आमच्या येथें झालेले बेत त्यास सविस्तर कळल्याशिवाय रहात नाहींत. तोंपर्यंत फिलिप शिरजोर होत जाणार व तुमची बेअब्रू, अपमान व नुकसान होत जाणार हें पक्कें लक्षांत ठेवा सारांश, पैसे खर्चण्यास तयार होऊन जरूर आहे तितकें सैन्य ठेवा; त्यांच्याविरुद्ध विनाकारण गिल्ला करणाऱ्या देशद्रोही वकल्याकडे लक्ष देऊं नका; अथेन्सला मदत करणारे लोक आहेत त्यांकडे वकील पाठवा आणि आपल्या येथें जे दुष्ट लोक आहेत त्यांची छिः थुः करून त्यांस बाहेर घालवून द्या. " या बोलण्याचें वजन लोकांवर पडून डायोपीथीस हा कामावर राहिला व खर्सोनीझ फिलिपच्या ताब्यांत गेलें नाहीं.

या वेळेला डिमास्थिनीस याचें लोकांवर फारच वजन बसलें होतें. शांतता असावी. असें ह्मणणारांचा पक्ष दुर्बल झाला होता. शिवाय यापुढें तीन महिन्यांनीं त्यानें जें एक विलक्षण आवेशाचें भाषण केलें, त्यावेळीं तर त्याचा फारच मोठा जयजयकार झाला. फिलिपनें आपला मोर्चा, पेरिंथस व बिझान्शियमकडे वळविला, तेव्हां पुनः आमच्या वृहस्पतीनें ग्रीसच्या स्वातंत्र्यहरावर आपला ताशेरा झाडला. "आपल्यामध्यें जी दुही माजली आहे व जी बेपरवाई उत्पन्न झाली आहे, त्यांपासून ग्रीक देशावर मोठा कहर गुदरला आहे. खुद्द अथेन्स येथील लोकांच्या हलगर्जीनें व बेपरवाईनें आमच्या संस्थानाचा कारभार अशा थरास येऊन पोंचला आहे कीं आपले उपदेशक व आपण या उभयतांनीं स्वदेशाचा नाश कसा करावयाचा याबद्दल सूचना आणून त्या मंजूर केल्या असत्या व त्या सूचनाविशेषांप्रमाणें वर्तन केलें असतें, तरी आमचा इतका तोटा होतांना! महाराज, कांहीं लोक ह्मणतात, 'दम खा, फिलिपनें लढाई करतों ह्मणून सांगेपर्यंत आपल्यास कांहींएक करितां येत नाहीं. लढाई करण्याचा प्रसंग आलाच तर मग काय तयारी करावयाची याचा आपण विचार करूं. सध्यां घाई नाहीं.' या उपदेशाप्रमाणें आपण चालल्यास आपल्यासारखे भोळसर लोकच सांपडणें कठीण असें ह्मटलें पाहिजे. मित्रहो! तो अगदीं आमच्या शहरांत आला तरी लढाईचा खलिता पाठविणार नाहीं हें पाठीमागील अनुभवावरून तुमच्या लक्षांत आलें नाहीं काय? खर्सोनीझ हा आमचा प्रांत आहे हें सर्व लोकांस ठाऊक असतांही तो तेथें हल्ला करावयास सैन्य पाठवितो याचा अर्थ काय? तहाच्या शर्तीप्रमाणें चालण्याची ही का तऱ्हा? हल्लीं त्याची

अथेन्समध्यें जी धवळाधवळ सुरू आहे, पिलापोनीससमध्यें फितुर चालला आहे, आपल्या सैन्यानिशीं तो अनेक शहरें काबीज करीत आहे, या सर्वांवरून तो अथीनियन लोकांशीं लढाई करण्याची तयारी करीत नाहीं, व तहही मोडीत नाहीं असें म्हणण्याची कोणाची छाती आहे? अगदीं शहराच्या भिंतीला उल्हाडयंत्रें लावीपर्यंत स्वस्थ बसणाऱ्या अथीनियनांची गोष्ट निराळी! बांधवहो! ज्यावेळीं फोकीस शहराचा त्यानें विध्वंस केला, त्यावेळेपासूनच वैराग्नी धुमसूं लागला आहे. वादविवाद करण्याचा समय आतां राहिला नाहीं; उठा, आपल्या मित्रांस मदत पाठविण्याची तयारी करा. सर्व ग्रीसदेश घायाळ होऊं पहात आहे, याकरितां वेळेवर ह्या गोष्टीचा विचार होऊं द्या. हरहर! काय आपली दुर्दशा ही? ज्या आम्हीं कधींही स्पार्टा अगर इतर राष्ट्रास आपल्या स्वनगरीच्या कारभारांत हात घालूं दिला नाहीं, त्यांनींच एका रानटी व परक्या नरपशूस ती परवानगी द्यावी, हा विचित्र हास्यस्वाचा प्रकार नव्हे काय? पूर्वी जो हक्क आपण दुसऱ्यास प्राणांतींही देत नव्हतों, तो हक्क आतां, फिलिफ आमचा लाडका, म्हणून मासिडोनिआचे राज्यास आपण देतों! एकापाठीमागून एक ग्रीशियन शहरास नागवून त्याचा फडशा पाडण्याची परवानगी फिलिप देवाकडेच अर्पण केली आहे. अथेन्स, स्पार्टा अगर थीब्स या तीन शहरांच्या लोकांस हा हक्क दिला नाहीं इतकेंच नाहीं, तर त्यांनीं कोठें येवढासा जुलूम केला कीं त्यांच्या विरुद्ध सर्व लोक लढाई करण्यास तयार होत! आणि आतां? गेल्या तेरा वर्षांमध्यें त्यानें कोणाच्या डोक्यावरून कातर फिरविली नाहीं? थ्रेसच्या सरहद्दीवरील आलिंथस वगैरे ३२ शहरें उध्वस्त केलीं त्यासंबंधें मी सध्यां कांहीं म्हणत नाहीं. येवढा थोरला फोकिस लोकांचा प्रदेश उजाड झाला, ती गोष्ट एकीकडे ठेवितां, पण थेसलीची सध्यां काय दशा आहे? तेथील राज्यपद्धति, स्वतंत्रता वगैरेंची वाताहत होऊन तो प्रांत सर्वथा फिलिपच्या हातांत जाऊन पडला आहेना! युबिया बेट आपल्या इतकें जवळ असतांनाही तेथें सध्यां अनीतिमूलक स्वाधसत्ता त्याच्या मदतीनें स्थापन केली आहे कीं नाहीं? 'माझें एकतील त्यांच्याशीं माझा स्नेह चालेल' असें तो वरचेवर म्हणत नाहीं काय? इतकें सगळें पाहून व ऐकून सुद्धां आम्हांस पुण्यप्रकोप प्राप्त होऊन संघमत करण्याचा आम्ही विचार करीत नाहीं! परशुस आम्ही खुशाल वाढूं देत आहों व दुसऱ्याचा नाश होईपर्यंत आम्ही चैनींत स्वस्थ आहों व ही मोठी आनंदाची गोष्ट आहे नाहीं बरें? महाराज, आमचा देशाभिमान अस्तंगत झाला. शत्रूकडून लांच घेऊन फितुर करण्याची संवय आम्हांस लागली. देशद्रोही मनुष्य उघड्या माथ्यानें हिंडूं लागला. स्वदेशभक्तांची आपण थट्टा व द्वेष करूं लागलों. हा सर्व प्रकार अत्यंत

लाजीरवाणा होय. असले लोक नाहींसे झाल्याशिवाय आपली धडगत नाहीं "

या भाषणाचा चांगला उपयोग होऊन अथेन्सनें लढाईची कंबर बांधिली, व फिलिपनें बिझान्शियमवर हल्ला केला होता तेथून त्यास पिटाळून लावण्याचें श्रेय घेतलें. फिलिपचा पराजय होऊन त्यास रडतमुखानें परत जावें लागलें. या सर्व कृत्यांबद्दल डिमास्थनिसची वाहवा होऊन त्यास लोकांनीं चांगलें बक्षीस दिलें. 'सत्पक्षाचा उदय हा कधीं तरी व्हावयाचाच,' ह्या वाक्यांत किती-तरी सत्यांश भरलेला आहे ?

---

# भाग ६.

## स्वातंत्र्यनाश आणि वाग्युद्ध.

### आलिया भोगासी सादर असावें.

आतां ग्रीस देशावर पारतंत्र्याची गदा पडणार त्याकडे आपल्यास वळलें पाहिजे. त्यांच्या स्वातंत्र्याचा नाश झाला, त्यास मूळ कारण ह्मणजे अन्योन्यमत्सर होय. डिमास्थेनीस ज्या प्रसंगाचें आगमन फार दिवसांपासून त्यांस कळवीत होता, तो प्रसंग आतां लवकरच येणार आहे. निराश होण्यास अनंत कारणें असतांही शेवटपर्यंत जो हताश झाला नाहीं, त्या प्रसिद्ध वक्त्यानें लागेल तितके श्रम घेतले हें वाचकांस माहीत झालें आहे; पण शेवटची धोंड कशी येऊन पडली तें अजून त्यांस समजलें नाहीं. तिकडे अतां आपण जाऊं.

नाहीं ह्मणायला एकदां कायतो फिलिपचा पराजय झाला आणि तो ३४० त. अथीनियन लोकांस आपल्यावरील अरिष्ट टळणार असें वाटूं लागलें. ३३९ मध्यें ग्रीस लोकांच्या शत्रूचा उत्तरेकडील लोकांनीं चांगला खरपूस समाचार घेतला. शिवाय डिमास्थेनीसच्या खटपटीनें आरमारखात्यांत अशी जंगी सुधारणा झाली कीं ईजियन समुद्रांत अथीनियन लोकांचा हात धरणारा कोणी राहिला नाहीं. याप्रमाणें भरभराटीचे दिवस लवकरच येतील, असा रंग दिसूं लागला.

पण दैवाची गति विचित्र आहे भरतीमागें ओहोटी लागलेलीच ! ती कशी ती पहा. या वर्षी कांहीं क्षुल्लक कारणांवरून तिसऱ्या धर्मयुद्धास सुरवात झाली. धर्माविरुद्ध कांहीं वर्तन केलें असा अथीनियन लोकांवर आरोप होता, तो नाहींसा व्हावा ह्मणून एस्किनीज नामक अथीनियन वक्त्यानें लॉक्रियन लोकांविरुद्ध देवाच्या जमिनी नांगरल्या, असा आरोप

आणला, व डेल्फाय क्षेत्रामध्यें जमलेल्या लोकांमध्यें चळवळ करून लोक्रियन लोकांची त्या जमिनीवर असणारी सर्व मालमत्ता जाळून पोळून टाकिली. लोक्रियन लोकांनीं या यात्रेकरू लोकांवर हल्ला केला व याप्रमाणें धर्मयुद्धाचें तोंड लागलें. सभेतील अध्यक्षानें लोक्रियनविरुद्ध लढाई सुरू करावयाची असें प्रसिद्ध केलें. या युद्धानें सर्व ग्रीस देशस्थ लोकांचें स्वातंत्र्य नष्ट व्हावयाचें होतें. एस्किनीजनें केलेला उद्योग ऐकल्याबरोबर डिमास्थेनीस ओरडला, "अरे अधमा ! तूं ह्या धर्मयुद्धानें अथेन्सचा नाश करीत आहेस व फिलिप यास अथेन्सवर हल्ला करण्याचा मार्ग दाखवीत आहेस. अथीनियनानो ! ह्या युद्धामध्यें तुम्ही यत्किंचितही वांटा घेणें अनर्थावह आहे." ह्या व दुसऱ्या भाषणानें या धर्मयुद्धास अथेन्सकडून मदत झाली नाहीं. याप्रमाणेंच अन्यत्रही स्थिति झाली. शेवटीं धर्मलंड लोक्रियन लोकांस शासन करावें एतदर्थ अध्यक्षानें राजाफिलिपास बोलावणें पाठविलें व त्यानेंही तें मोठ्या आनंदानें कबूल केलें. लोक्रियन लोकांचें शासन करण्यासाठीं तो दक्षिणेकडे आला तो मोठ्या सैन्यानिशीं आला; पण थर्मापिलीच्या घांटावरून पश्चिमेकडे जावयाचें सोडून देऊन त्यानें दक्षिण ग्रीसची मुख्य किल्ली जो इलेटिआचा दुर्ग त्याच्यावर हल्ला करून तो आपल्या ताब्यांत घेतला व थीब्सच्या लोकांस 'मी मोठ्या सैन्यासहवर्तमान आलों आहें, तर अथेन्सवर हल्ला करण्याकरितां तुम्हीं मला मदत केली पाहिजे,' अशा अर्थाचें पत्र लिहिलें ! इलेटिआ अथेन्सपासून सुमारें ६० च मैल होतें. फिलिप इतका जवळ आला हें ऐकून अथीनियन लोकांची पांचांवर धारण बसली; कोणासही काय बोलावें हें सुचेना. सर्व लोक मुखस्तंभ होऊन बसले. शेवटीं डिमास्थेनीस पुढें येऊन त्यानें पुढील भाषण केलें :—

"थीब्स लोकांचें फिलिप यास साहाय्य आहे, अशी कल्पना करणार लोकांस वस्तुस्थिति माहीत नाहीं. फिलिप यास ती मदत असती तर थीब्सच्या सरहद्दीवर तो न राहता, एकदम ॲटिकाच्या प्रांतावर त्यानें स्वारी केली असती. ज्यांस त्याचे पैसे पोंचत आहेत, ज्यांची तो आर्जवें करीत आहे, असे कांहीं थीबन लोक त्यास वश आहेत हें खरें; पण सर्व थीबन लोकांची तशी स्थिति नाहीं. सैन्याचें अवडंबर आणून आपल्या मित्रांस धीर द्यावा व शत्रूंस हतवीर्य करावें असा त्याचा इरादा आहे हें ठाऊक असल्यावरही आपण सर्व थीबिअन लोक आपले शत्रू आहेत अशी कल्पना करून चाललों तर फिलिपला जें हवें आहे तेंच आपण केलेसें होईल. असो. आतां काय करावयाचें? प्रथमतः तुम्हीं गर्भगळित झाल्यासारखे दिसतां, पण मी तुम्हांस सांगतों कीं मनांतील सर्व भय काढून टाका. लढण्यासारखे जितके लोक आहेत त्या सर्वांस श-

त्यांच्यासह युद्धाकरितां बाहेर निघण्याचा हुकूम द्या, ह्मणजे तुमचे जे थीब्समध्यें मित्र आहेत त्यांस धीर येऊन ते देशस्वातंत्र्याकरितां युद्धास तयार होतील, व तुमच्याशीं तह करतील, परंतु सध्या अटी ठरविण्याच्या भानगडींत पडूं नका. आपल्या या खटपटींचा कांहीं उपयोग झाला नाहीं व थीब्स लोक फिलिपास वश झाले तर निरुपाय आहे. पण आपण तरी निदान देशकार्याकरितां योग्य खटपट केली असें ध्सर्वतोमुखीं शेवटपर्यंत राहील."

या भाषणानें अथीनियन लोक खुष होऊन त्यांनीं त्याचें ह्मणणें कबूल केलें व त्यासच थीब्स लोकांकडे वकिली करण्यास पाठविलें. तेथें फिलिपचे वकील होतेच. थीब्सचें व अथेन्सचें वांकडें ! त्यांत फिलिप सर्व सैन्यासह तेथें होता ; तेव्हां डिमास्थेनीस यास जय मिळेल अशी बिलकुल आशा नव्हती. तथापि त्यानें आपल्या सरस्वतीसामर्थ्यानें व वक्तृत्वशक्तीनें थीब्स येथील लोकांस मोहनी घालून लवकरच आपलेंसें केलें आणि फिलिपास सपशेल फशीं पाडलें. थीब्स व अथीनियन लोकांचें सैन्य एकत्र मिळून चाललें आहे असें पाहून डिमास्थेनीस यास स्वगौरवपूर्वक केवढा अभिमान वाटला असेल बरें ? थीब्समध्यें गेल्यावरची अथीनियन लोकांची सरबराई फारच उत्तम तऱ्हेनें झाली व अथीनियन पाहुणेही मोठ्या चांगल्या रीतीनें तेथें वागले. फिलिप व ग्रीक लोक या उभयतांचीं सैन्यें समोरासमोर आल्यानंतर पहिल्या दोन चकमकींत ग्रीक लोकांस अंशतः जय मिळाला. मोठी दुःखाची गोष्ट आहे कीं या वेळेचा वृत्तांत जसा लिहिलेला असावा, तसा नाहीं. शेवटची लढाई केरोनिया येथें झाली. या लढाईंत जय कोणास येणार तें अगोदरच ठरलें होतें; कारण ग्रीक लोकांस उत्तेजन देऊन लढाईमधील डावपेचांत सुरक्षित रीतीनें वागविणारा असा सेनानी कोणीही नव्हता. डिमास्थेनीसचा उपयोग वादविवाद करण्यांत, लढाईच्या मुख्य मुख्य गोष्टी ठरविण्यांत उत्कृष्ट रीतीनें झाला हें खरें. परंतु त्यास लढाईचें अंतर्ज्ञान नसल्यामुळें, प्रत्यक्ष रणांगणांत त्याचा बिलकुल उपयोग झाला नाहीं. असो, लढाई पुष्कळ वेळ चालली. थीब्स लोक मरेतोंपर्यंत लढले. अथेन्सकरांनीं बराच वेळ टिकाव धरला. पण त्यांस नेहमीं लढाईचा सराव नसल्यामुळें मासिडोनिआच्या लोकांनीं पिटाळून लावलें. पळणाऱ्यांमध्यें डिमास्थेनीज पहिला होता असें सांगतात. आमच्या प्रसिद्ध वक्त्याचे सर्व बेत जरी फसले तरी लोकांचा त्यावरील विश्वास यत्किंचितही कमी झाला नाहीं. फिलिपनें तह केला त्यांत पुष्कळ चांगलीं कलमें होतीं; फक्त एकच कलम वाईट होतें आणि तें हें कीं ग्रीस देशांतील सर्व संस्था-

नांनीं फिलिपचें अंकित होऊन राहावें. हा मुद्दा कबूल करण्याचे वेळीं डिमास्थेनीस यास काय वाटलें असेल बरें ? मॅसिडोनच्या स्वातंत्र्याकरितां ज्यानें रात्रंदिवस खटपट केली त्यास फिलिपनें सांगितलेल्या अटी कबूल करण्याचे भाग पडावे ही केवढी दुःखकारक गोष्ट आहे ? पण उपाय काय ?

अथीनियन लोकांनीं मात्र त्याचा कृतज्ञतापूर्वक सन्मान केला. शहरव्यवस्थेसंबंधानें त्याकडे निरनिराळीं कामें त्यांनीं सोंपविलीं. पुढें त्याची वकिली चांगली चालूं लागुन त्यास पैसेही रगड मिळूं लागले. असो. ३३६ मध्यें फिलिप याचा खून झाला ही बातमी अथेन्स येथें समजतांच डिमास्थेनीसनें स्वतांस मुलीच्या मरणाबद्दलचें सुतक होतें तरी तें एकीकडे ठेवून व चांगला रुणाचा पोषाख करून तो बाहेर आला व फिलिपच्या मरणाबद्दल ईश्वराचे आभार मानले. बहुधा त्यास वाटलें असावें कीं फिलिपच्या पाठीमागें मासिडोनियाच्या राज्याची वाताहत होणार. फिलिपचा मुलगा जगद्विजयी अलेक्झांडर हा एक पोकंपट्या पोर आहे अशी त्याची समजूत होती. अलेक्झांडर अनेक गोष्टी शिकण्याचा प्रयत्न करी त्यावरून त्यास तो Jack of all trade. 'एक धड ना भाराभर त्या चिंध्या कशाला' असें म्हणत असे. डिमास्थेनीसनें परशिआच्या महाराजास लिहून मासिडोनिआचें राज्य पालथें घालण्याकरितां त्याकडून पैसे आणविले. स्वातंत्र्य मिळविण्याकरितां त्यानें येवढा खटाटोप केला. केरोनिआची लढाई झाल्यावर तीनच वर्षांच्या आंत अलेक्झांडरनें उत्तरेकडील सर्व शत्रूंस पादाक्रांत केलें आणि थीब्स लोकांनीं बंड केलें असें ऐकतांच वाघासारखा त्या दुर्दैवी शहरावर चाल करून आला व थोडक्याच दिवसांत तें शहर सर केलें, व बंड केल्याबद्दल त्या लोकांस देहांत प्रायश्चित्त दिलें. हें ऐकून अथीनियन लोक गर्भगळित होऊन गेले. आपला तरी बचाव व्हावा या हेतूनें त्यांनीं त्या महावीराकडे स्वानंदप्रदर्शनार्थ जे वकील पाठविले त्यांनीं, थीब्स शहर सर करून त्यांचा फडशा पाडला, ह्याबद्दल अलेक्झांडरची मनमुराद स्तुति केली. ही निलाजरी खुशामत पाहून त्या तरुणवीरास अतिशय संताप आला व त्यानें 'तुमच्या येथील नऊ वक्ते-डिमास्थेनीस वगैरे-माझ्या स्वाधीन करा' असें मागणें लावलें व अथेन्स शहरांतील शहाण्यांतील शहाणा फोकिअन यानें लोकसभेत सांगितलें कीं सर्व राष्ट्राचें संरक्षण होत आहे तर या व्यक्तींनीं तिकडे जावें हेंच चांगलें. यांस उत्तर देतांना डिमास्थेनीसनें 'लांडगे आणि मेंढ्या' या इसापनीतींतील गोष्टीचा अनुवाद करून म्हणाला आम्हांस तिकडे ओलीस पाठविणें म्हणजे मेंढ्याच्या गोटांतील विश्वासुक कुत्रे तिकडे पाठविल्याप्रमाणें होईल. शेवटीं मोठ्या मिनतवारीनें या नवांचे प्राण वांचले.

पुढें अलेक्झांडरनें चार वर्षांच्या आंतच सर्व परशिआचें राज्याचा विध्वंस केला. सन ३३० वर्षी परशिआचा राजा डरायस याचा खून झाला. त्याच वर्षी ग्रीस देशांत देशस्वातंत्र्य मिळविण्याची खटपट झाली ती व्यर्थ गेली व मासिडोनिआशीं वैरबुद्धीनें वागणारे सर्व मुत्सद्दी अपकीर्तीस पात्र झाले. त्यांचा वैरी जो एस्चिनिस यानें हीच वेळ साधून डिमास्थेनीसवर गैरकायदा वागल्याचा आरोप ठेऊन त्याच्यावर खटला सुरू केला, व याप्रमाणें उत्कृष्ट कामगिरी बजावल्याबद्दल डिमास्थेनीसला शिरपेच मिळावयाचा होता त्यांत ' खो ' आणला. आणि आपल्या बोलण्यांत त्यानें असें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला कीं तीन चांगल्या संधी आल्या असतां डिमास्थेनीसनें त्यांच्यापासून स्वदेशास फायदा करून घेतला नाहीं यावरून खरा देशाभिमान त्यामध्यें नाहीं व त्यानें जीं जीं कृत्यें व भाषणें केलीं तीं सर्व केवळ स्वगौरवास्तव केलीं.

ह्या दोन वाचस्पतींमध्यें जें दारुण वाग्द्वंद्व झालें त्याचा चमत्कार पाहण्यासाठीं नाना देशांतून श्रोतृजनांचा समूह जमा झाला होता. मूळ प्रश्न हा होता कीं डिमास्थिनीस हा चांगला कीं वाईट; ज्या कार्याची सुपारी मी आपल्याकडे घेतली आहे असें तो ह्मणे. तें कार्य त्यानें कितपत बजाविलें, व देशाच्या संकटसमयीं तो किती उपयोगी पडला. " मी ज्या कार्याकरितां झटलों तेंच आमचें खरें कर्तव्य होतें. या कार्यांत आमचा पराजय होणार ह्मणून जरी मला ठाऊक असतें, तरी जसें मी बोललों व वर्तन केलें तसेंच बोलणें व वर्तन मी ठेवलें असतें. त्यांत रतिमात्रही फरक केला नसता. मी जें जें काय केलें त्याचा मला संतोष व अभिमान वाटतो. पारतंत्र्यांत राहणें हें जर भयंकर आहे तर अथेन्सनें ती लज्जास्पद स्थिति टाळण्याकरितां जी खटपट केली तीच अथेन्सला कीर्तिदायक होणार आहे."

हा त्या भाषणाचा सारांश आहे. अथीनियन व ग्रीशिअन स्वातंत्र्य मृत झालें त्याच्या उत्तरक्रियेमध्यें गाण्याचा हा पोवाडा आहे. मासिडोनिअन लोक सत्ताधीश असतांही म्हणजे त्यांची सर्वगामी सत्ता भयप्रद असतांही मासिडोनिआच्या विरुद्ध बोलणारा डिमास्थेनीस यानें आपल्या वक्तृत्वसामर्थ्यानें सर्व श्रोतेजन आपल्यासारखे केले. एस्चिनिसच्या वाट्याला —[१] सुद्धां मतें मिळालीं नाहींत. तेव्हां त्यास अथेन्समधून गाशा गुंडाळून दुसरीकडे जावें लागलें. एकदां ऱ्होडस येथील आपल्या वक्तृत्वाच्या शाळेंत त्यानें डिमास्थिनीजचें भाषण म्हणून दाखविलें, तेव्हां त्याची शिष्यशाखा आनंदानें टाळ्या वाजवूं लागली. त्या आटपल्यानंतर एस्चिनीज म्हणाला " अर त्या राक्षसास स्वतां बोलतांना तुम्ही ऐकलें असतें तर मग काय केलें असतें कोण जाणे ?

ह्याप्रमाणें त्याच्यावर आणलेल्या आरोपांचा निरास झाला. पण त्या-
च्यावर पुनः दुसरेंच एक अरिष्ट ओढवलें. अलेक्झांडरनें प्रांत काबीज के-
ले तेथें एक एक सुभेदार ठेवावयाचा अशी व्यवस्था ठरली होती. या सुभे-
दारांत हरपालस नांवाचा अधाशी व उधळ्या असा एक सुभेदार होता.
लोकांस नागवून त्यानें पुष्कळ पैशाचा ' स्वाहा ' केला होता. शिवाय
आपल्यास कोठें तरी आधार असावा ह्मणून अथेन्स शहरांतील लोकांस
पैसे चारून खूष करून ठेविलें होतें. हिंदुस्थानांतील कांहीं मुलुख सर क-
रून जेव्हां अलेक्झांडर परत फिरला, तेव्हां हरपालसास दहशत पडली व
५००० टॅलेंट्स घेऊन तो आशियांतून जो पळाला तो थेट अथेन्स शहरीं
आला. हा पैसेवाला सुभेदार मोठ्या लष्करजम्यानिशीं आला आहे तेव्हां
आपल्या शहरांत स्वायत्त राज्याची स्थापना करील या भीतीनें अथीनिअन
लोकांनीं त्यास शहरांत येऊं दिलें नाहीं. पुढें त्यानें आपले सर्व सेवक अ-
न्यस्थळीं पाठवून दिल्यावर त्यास आंत घेतलें. आल्याबरोबर त्यानें अ-
लेक्झांडराचें मासिडोनिया येथील राज्य उलथून पाडण्यास ही संधी चां-
गली आहे असें बोलणें लावून वक्ते व मुत्सद्दी यास लांच देण्याचा सपाटा
लावला. पण फोकिअन व डिमास्थनीज यांच्या पुढें त्याचें कांहीं चालेना.
हें चाललें आहे तों अलेक्झांडरचा मासिडोनिया येथील कारभारी ॲंटि-
पेटर यानें हरपालसास आपल्या स्वाधीन करावा अशी मागणी केली, प-
रंतु ती अथेन्सकरांनीं ऐकली नाहीं. पण डिमास्थनीजच्या सूचनेवरून
असा ठराव केला कीं अलेक्झांडरची खर्पी काय आहे ती कळेपर्यंत हर-
पालसास कैद करावा व त्याची मालमत्ता जप्त करावी. आपल्यास कैद
करणार असें कळल्याबरोबर हरपालस पळून गेला. पण त्याची संप-
त्ति (७२० टॅलेंट्स) सर्व तेथेंच राहिली. पुढें सरकारचीं माणसें प्रत्यक्ष जा-
ऊन पाहतात तों ३५० टॅलेंट्सच सापडले ! तेव्हां बाकीचा पैसा कोठें ग-
ला याची चौकशी करण्याकरितां अथेन्स येथील न्यायसभेनें डिमास्थे-
नीजच्या सूचनेवरून एक मंडळी नेमिली. चौकशी सहा महिने होत हो-
ती. प्रत्येक सार्वजनिक माणसाच्या येथें जाऊन त्यांनीं झाडा घेतला
आणि शेवटीं कोणाकडे किती पैसे गेले याची यादी केली. त्यांत डिमा-
स्थनीजच्या नांवांवर २० टॅलेंट्स होते ! डिमास्थनीजची चौकशी झाली.
पंचाइतांनीं तो दोषी आहे असें ठरविलें. ( कांहीं अलेक्झांडरास खूष करावें
ह्मणून व हरपालसाचे पैसे घेतले होते ह्मणून कांहीं, डिमास्थनीजवर
आरोपाची शाबिती करण्यास सिद्ध झाले होते हें विसरतां कामा नये. )
आरोपानें ५० टॅलेंट्स दंड द्यावा असें ठरविलें. पण दंड देण्याची डि-
मास्थनीसास ऐपत नसल्यामुळें त्यास कांहीं दिवस देशांतर करावें लागलें.
हा त्याच्यावर वृथारोप आला होता, असें सर्व इतिहासकारांचें ह्मणणें आहे.

तथापि प्लुटार्क नामक चरित्रकारानें एक गोष्ट लिहिली आहे, ती खोटी दिसते तरी सांगितल्यावांचून राहवत नाहीं. हरपालस यानें आपल्या येथें शहरांतील बहुतेक वक्ते व मुत्सद्दी मेजवानीस बोलावले होते. त्यांत डिमास्थेनीजही होता. यजमानाच्या येथील संपत्ति पाहतां पाहतां डिमास्थेनीज याच्या दृष्टीस एक सुवर्णाचा चषक दृष्टीस पडला व त्याच्या सौंदर्यामुळें डिमास्थेनीजची दृष्टि त्याकडे लागून राहिली. हा प्रकार यजमानाच्या ध्यानांत आला व त्यानें दुसरे दिवशीं तापडतोब तो पेला व २० टॅलेंट्स आपल्या प्रसिद्ध पाहुण्याकडे धाडून दिले व डिमास्थेनीजला हीं तीं देणगी नाकारवली नाहीं. दुसरे दिवशीं डिमास्थेनीज लोकसभेंत गळयास गळपट्टा बांधून आला व त्यानें खुणेनें सांगितलें कीं 'मला आज हरपालसच्या कामांत कांहीं बोलतां येत नाहीं.' सभेंत एक लहु निरंजन होता त्यानें सुचविलें कीं 'गळ्याला रुपेरी रोग झाला आहे.' सर्वजण हंसले, पण पुष्कळांस राग आला. यावरून डिमास्थेनीजनें लांच घेतला असें प्लुटार्कचें ह्मणणें आहे. पण तें इतर अनेक प्रमाणांवरून असत्य आहे असें दिसतें.

सन ३२३ मध्यें अलेक्झांडर मेल्यावर पुनः त्यास स्वदेशीं येण्याचें निमंत्रण आलें. त्यानें तेथें गेल्यावर मासिडोनिआचें वर्चस्व नाहींसें करावें व ग्रीक देश स्वतंत्र व्हावा याबद्दल खटपट चालविली. पण ही सर्व खटपट ३२२ मध्यें जी क्रेनानची लढाई झाली तेथें रसातळास गेली. अथेन्सचें स्वातंत्र्य सर्वांशीं नष्ट झालें. ॲंटिपेटरच्या आग्रहास्तव मासिडोनिआविरुद्ध असणाऱ्या सर्व मुत्सद्यांस देशत्याग करावा लागला. डिमास्थेनीजच्या पाठलाग मासिडोनिअन स्वार करीत होते. आपला टिकाव लागत नाहीं असें पाहून त्यानें एक दिवस विषानें भरलेली लेखणी पत्र लिहिण्याच्या मिषानें हातांत घेऊन ती चावून टाकिली व प्राणत्याग केला. स्वदेशस्वातंत्र्य मिळणें शक्य नाहीं असें समजल्याबरोबर आपल्या अवताराचें कारण संपलें असें करून त्यानें आपलें मौल्यवान् आयुष्य ईश्वराच्या स्वाधीन केलें.

---

# उपसंहार.

—:*:—

मुत्सद्दी अगर वक्ता यांपैकीं कोणत्याही दृष्टीनें पाहिलें असता डिमास्थेनीजच्या कर्तृत्वशक्तीविषयीं मतभेद होईल असें वाटत नाहीं. ग्रीक लोकांमध्यें कांहीं गोष्टी चांगल्या व वंदनीय आहेत असें ज्यास वाटेल,

त्यास डिमास्थेनीजची स्तुति केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्याच्या राजकीयपंथामध्यें कधींहीं विसंगतपणा दिसला नाहीं. त्याचा अवतार फक्त एक गोष्ट सिद्धीस नेण्यासाठीं होता. ग्रीसदेश स्वतंत्र असावा व अथेन्सला या स्वतंत्र देशाचें अधिपत्य असावें अशी डिमास्थेनीजची इच्छा होती. सर्व लोक निराश झाले तरी त्यानें आपल्या कामाचा पिच्छा सोडला नाहीं. हजारों अडचणी आल्या तरी तो आपल्या स्वतत्वाला एकनिष्ठ राहिला. असला मुत्सद्दी बोलूं लागला असतां लोकांच्या विवेकशक्ति, कर्तव्यबुद्धि आणि उन्नत स्वदेशभक्ति ह्या वृत्ति जागृत होऊन कार्यक्षम होत असत ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आपल्या स्वदेशबांधवांस खऱ्या व रीतीच्या गोष्टी सांगितल्या असतां आपल्या पूर्वजांप्रमाणें तेही महापराक्रमी होतील असें त्यास वाटत असे. पण तें सर्व व्यर्थ गेलें. याचें कारण इतकेंच कीं तेथील सर्व लोक आळशी, कद्रू, व एकलकोंडे झाले होते. व्यवहारास उपयोगी नाहीं ह्मणून प्लेटोचा पंथ त्यास कधींहीं आवडला नाहीं. अथेन्सनें आपला मोठेपणा व वैभव पुनः मिळविण्याची खटपट करावी अशी त्याची दृढ समजूत होती.

'तुझा अथेन्सा मान आहे, त्वां विश्वमुकुटमणी व्हावें।'

असें त्याचें ह्मणणें असे.

वक्तृत्वामध्यें त्याचा हात धरणारा कोणीही झाला नाहीं असें सर्व परीक्षकांचें मत आहे. नैसर्गिक बुद्धि आणि दृढाभ्यास यांचा हा परिणाम! त्याचा उद्योग विलक्षण होता. तो आपलें भाषण फार काळजीनें तयार करीत असे. त्याच्या भाषणामध्यें सर्व प्रकार होते. प्रतिपक्ष्यांचा पुरा पचंपा कसा उडवावा ही मार्ली लार्ड डर्बीची खुबी, बोलण्यामधील ग्लॉडस्टनचें शब्दगौरव व ब्राईटचें शब्दसौष्ठव इत्यादि गुणांमध्यें तो परिपूर्ण होता. या सर्व मुत्सद्यांत जितका स्वदेशाभिमान भरलेला आहे अगर होता तितका सर्व डिमास्थेनीजमध्यें भरला होता यांत शंका नाहीं. खऱ्या अंतःकरणानें स्वदेशाचा पडता पक्ष असतांही त्यासाठीं स्वत्याग करून व प्रसंगानें ओळखणाऱ्या मनुष्यांस अप्रिय सत्य रात्रंदिवस सांगून त्यांची उचल स्वदेशरक्षणाकडे करणें हें लहान काम नाहीं.

असो, याप्रमाणें चरित्रनायकासंबंधानें जेवढी माहिती मिळवितां आली तेवढी एकत्र करून लिहिली आहे. या वाचनानें स्वदेशप्रीतीचा अंकुर महाराष्ट्रांत उत्पन्न झाल्यास वरील श्रमाचें सार्थक होईल असें मी समजतों.

# पुणें येथें आर्यभूषण छापखान्यांत मिळणारीं पुस्तकें.

**धर्मौदार्य**—वे० शा० रा० रा० बाळ यज्ञेश्वरशास्त्री गुरजर यांचें व्याख्यान किं० १। आणा ट० हं० ०॥ आणा.

**सोनें व रुपें यांचा हिंदुस्थानांत खप.**—रा० रा० वासुदेव गोपाळ भांडारकर, बी. ए. एल्. एल्. बी, वकील हायकोर्ट, मुंबई. यांचें व्याख्यान किं. १ आणा. ट. हं. ०॥.

**प्रयागांतील राष्ट्रीय सभेची हकीकत.**—डा० सदाशिव वामन काणे एल. एम. अॅन्ड एस. यांचें व्याख्यान. किं० ०१०३. ट. हं० ०॥.

**जलधिजवर्णन**—डा० कानोबा रणछोडदास किर्तीकर, सर्जन मेजर, सिव्हिल सर्जन, ठाणें यांचें व्याख्यान. किं० ३ आणे. ट० ख० ०॥.

**सामाजिक विषयासंबंधी तोडजोड.**—नामदार का. त्रिं. तेलंग यांचें व्याख्यान. किं० ०२०६ ट० हं० ०॥.

**युरोपच्या इतिहासापासून आपल्या लोकांनीं कायशिकावें.**—रा० सा० वामन आबाजी मोडक प्रिन्सिपाल एलफिन्स्टन् हायस्कूल मुंबई. यांचें व्याख्यान किं० १॥ आणा ट. हं. ०॥

**स्थावरजंगमात्मक सृष्टीविषयीं माहिती.**—डा० काशिनाथ वामन काणे एल. एम. अॅन्ड. एस. यांचें व्याख्यान. किं० ०२. ट० हं० ०॥.

**आमची धर्मादाय पद्धति.**—रा० रा० जनार्दन दामोदर कोल्हटकर यांचें व्याख्यान. किं० ०१॥ आणा. ट० ख० ०॥.

**अॅन्टिकार्न लॉलिग अथवा इंग्लंडांतील धान्यावरील कराचे कायदे रद्द करण्याविषयीं दीर्घ प्रयत्न**—रा० रा० विष्णु कृष्ण भाटवडेकर बी. ए. एल. एल. बी, वकील, हायकोर्ट, मुंबई यांचें व्याख्यान. किं० १ आणा. ट० हं० ०॥. आणा.

**इतिहासाची पुनरावृत्ति**—रा० रा० रामचंद्र गणेश मुंडले बि. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट मुंबई यांचें व्याख्यान किंमत १॥। आणे ट. ख. अर्धा आणा.

**शरीरसामर्थ्य**—डा० मोरेश्वर गोपाळ देशमुख बी. एस. सी. एम. डी. असिस्टंट केमिकल अनालाइझर मुंबई यांचें व्याख्यान; किं० १॥ आणा. ट. हं. अर्धा आणा.

**हिंदूसमाजसुधारणा**—रा० रा० रामचंद्र गोविंद तळवलकर, मुंबई हिंदु युनियन क्लबाचे चिटणीस यांचें व्याख्यान, किंमत ३। आणे. ट. हं. अर्धा आणा.

# विक्रीस तयार.

## आर्यभूषण छापखान्यांतील पुस्तकें.

| | कि. रु. | ट. ख. |
| --- | --- | --- |
| केसरींतील निवडक निबंध भाग १ | १ | ०३ |
| केसरींतील निवडक निबंध भाग २ | १ | ०३ |
| निबंधमाला—( कै० वि० कृ० चिपळूणकरकृत ) | ३ | ०= |
| रिचर्ड काब्डेन यांचें चरित्र—( प्रो० चिं० गं० भानू बी. ए., कृत ) | ०११ | [illegible] |
| सद्गुणमंजरी—( एका हतभाग्य स्त्रीचें चरित्र ग० ज० आगाशे बी. ए. कृत ) | ०= | ०१ |
| डिमास्थेनिस यांचें चरित्र—(प्रो० चिं० गं० भानू बी. ए. कृत ) | ०१०६ | ०१ |
| सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांचें चरित्र.—(दक्षिणाप्राईझकमिटीकडून बक्षिस मिळालेलें) | ०१२ | ०२ |
| दुर्गा नाटक—( गो. ब. देवलकृत ) | ०५ | ०१ |
| चार्लस ब्राडला यांचें चरित्र | ०४ | ०१ |
| विलायतचा प्रवास.—भाग पहिला | ०१२ | ०२ |
| संगीत सौभद्र.—( किर्लोसकरकृत. ) | ०१२ | ०॥ |
| संगीत शाकुंतल.—( किर्लोसकरकृत. ) | ०१२ | ०॥ |
| धर्म आणि शास्त्र यांचा समेट.—( स्पेन्सरच्या ग्रंथावरून ) | ०१०३ | ०॥ |
| ब्राह्मण व ब्राह्मणीधर्म.—( प्रो० रा० रा० भागवत यांचें व्याख्यान ) | ०४ | ०॥ |
| मोगल व मोगली धर्म—( प्रो० रा० रा० भागवत यांचें व्याख्यान ) | ०१०६ | ०॥ |
| पार्स व पार्सी धर्म.—( प्रो० रा० रा० भागवत यांचें व्याख्यान | ०२०३ | ०॥ |
| षड्दर्शनसारनिरुक्ती.—( महामहोपाध्याय भीमाचार्य झळकीकर यांनीं दिलेलें व्याख्यान | ०२०६ | ०॥ |